# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १८ जून, २०१९ / ज्येष्ठ २८, १९४१ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण मंत्री**
**(३) कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
**(४) कामगार मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६८**

---

### परभणी शहराला सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत

**(१) * १३६५०२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी असलेल्या राहटी बंधाऱ्यात मुबलक पाणीसाठा असूनही महानगरपालिकेच्या हलगर्जीपणामुळे शहरवासियांना १७ ते १८ दिवसांतून एक वेळा पाणी मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील अनेक हातपंप बंद असून ते दुरुस्त केले जात नसुन, गावठाण भागातही महानगरपालिकेने टँकरव्दारे पाणी पुरवठा सुरु केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच परभणी शहरातील नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • परभणी शहराची सध्याची लोकसंख्या ही ३.५ लक्ष असून शासनाच्या मानकाप्रमाणे प्रतिमाणसी प्रतिदिन १३५ लिटर प्रमाणे सदर लोकसंख्येस सध्या अंदाजे प्रतिदिन ४७.२५ एमएलडी इतक्या पाण्याची गरज आहे.

• परभणी शहरास येलदरी धरणातून सोडण्यात येणारे पाणी रहाटी बंधारा येथे अडवून तेथून पाणीपुरवठा करण्यात येतो.

• सध्या या बंधाऱ्यात पाणीसाठा उपलब्ध असला तरी सध्या अस्तित्वात असलेली पाणीपुरवठा योजना ही १८ एमएलडी जलशुध्दीकरण क्षमतेनुसार आरेखित केली असल्याने परभणी शहरास सध्या १७ ते १८ दिवसातून एकदा पाणीपुरवठा होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) • परभणी शहरात एकूण ६२८ विंधन विहिरी अस्तित्वात असून उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याची पातळी खोल जाऊन पाणी आटल्यामुळे विंधन विहिरी बंद आहेत.

• काही किरकोळ कारणास्तव बंद असलेल्या विंधन विहिरी दुरुस्त करुन सुरु करण्यात आलेल्या आहेत.

• शहरात ज्या भागात पाणीपुरवठा करण्यात येत नाही, अशा भागात महानगरपालिका टँकरद्वारे पाणीपुरवठा करत आहे.

(३) • परभणी शहरास पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी केंद्रशासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी  योजनेअंतर्गत येलदरी धरणापासून परभणी शहरापर्यंत पाणी आणणारी मुख्य जलवाहिनी, २ जलकुंभ, १ एमबीआर व २६६ किलोमीटर वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण झाले असून सदर योजनेचे हायड्रॉलिक टेस्टींग प्रगतीपथावर आहे. सदर योजना ऑगस्ट, २०१९ अखेर कार्यान्वित करण्याचे परभणी महानगरपालिकेचे नियोजन आहे.

• त्याशिवाय, अमृत अभियानांतर्गत ६७ एमएलडी क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र, ६ जलकुंभ व १६६ किमी वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर असून सदर योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर योजना सप्टेंबर, २०१९ अखेर पूर्ण करण्याचे परभणी महानगरपालिकेचे नियोजन आहे.

• सदर दोन्ही योजना पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या मानकाप्रमाणे पाणीपुरवठ्यामध्ये प्रतिमाणसी प्रतिदिन १३५ लिटर अशी वाढ होणार आहे.

• तसेच शहरातील वितरण व्यवस्थेची १०० टक्के व्याप्ती पूर्ण होणार आहे.
• सदर दोन्ही योजना पूर्ण झाल्यानंतर शहरासाठी पाण्याची उपलब्धता वाढणार असून जलशुध्दीकरण केंद्राची व जलकुंभाची पुरेशी क्षमता उपलब्ध झाल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा नियमित व सुरळीत होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या ई-टेंडरिंग प्रक्रियेत होत असलेला गैरव्यवहार

**(२) * १३९८०९ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या ई-टेंडरिंग प्रक्रियेत अडीच हजार कोटी रुपयांचा तोटा महानगरपालिकेला झाला असून अधिकारी व कंत्राटदार संगनमताने गैरव्यवहार करत असल्याने या प्रकरणी चौकशी करण्यासंदर्भात स्थानिक नगरसेवकांनी मा.मुख्यमंत्री आणि प्रधान सचिव, नगरविकास यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ई-टेंडरिंग प्रक्रियेत महानगरपालिकेतील कामाच्या निविदा वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर अधिकारी संबंधित कंत्राटदाराला काम देऊन त्यासंबंधी एका कंत्राटदाराला दोन कंत्राटदार सपोर्टिंगमधून टेंडर भरण्यास तयार करुन निविदा १० ते १५ टक्के जास्त दराने देण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले,
(४) असल्यास, चुकीच्या पद्धतीने टेंडर भरणाऱ्या कंत्राटदाराचे टेंडर रद्द करुन काळ्या यादीत टाकण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशा आशयाचे निवेदन स्थानिक नगरसेवकांनी दिले आहे, हे खरे आहे.

(३) • माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.२९.०१.२०१३ च्या शासन निर्णयानुसार रू.१० लाख किंवा त्यापेक्षा अधिक मुल्यांच्या निविदांसाठी दि.०१.०२.२०१३ पासून ई-निविदा प्रणाली राबविण्यात येते.

• त्याअनुषंगाने NIC च्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर महानगरपालिकेच्या निविदा ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द केल्या जातात.

• ऑनलाईन निविदा प्रकरणी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात येत असल्याने तक्रारीत नमूद बाबी वस्तुस्थितीवर आधारित नसल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उदगीर (जि.लातूर) शहराच्या रस्ते विकास प्रकल्पामध्ये झालेल्या वित्तीय अनियमिततेबाबत

**(३) * १३८७२६ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत उदगीर (जि.लातूर) शहराच्या रस्ते विकास प्रकल्पामध्ये झालेल्या वित्तीय अनियमिततेबाबत आलेल्या तक्रारीवरुन आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी उदगीर नगरपरिषदेचे तत्कालीन नगराध्यक्ष श्री.राजेश्वर निटुरे यांची चौकशी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत श्री.निटुरे हे सकृतदर्शनी दोषी आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) उदगीर नगरपरिषदेअंतर्गत रस्ते विकास प्रकल्पामध्ये झालेल्या वित्तीय अनियमिततांची प्राथमिक चौकशी संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडून करण्यात आली होती. प्राथमिक चौकशीत वित्तीय अनियमितता झाल्याचे दिसून आले.

या अनियमितता सन २०११ ते २०१४ या कालावधीतील असून यास तत्कालीन नगराध्यक्ष श्री.निटुरे हे सकृतदर्शनी दोषी असल्याचे दिसून आले आहे.

(३) व (४) श्री.निटुरे हे आता नामनिर्देशित सदस्य म्हणून उदगीर नगरपरिषदेत कार्यरत आहेत. सबब १९६५ च्या अधिनियमातील कलम ४२ नुसार त्यांना या अनियमिततांसाठी सदस्य पदावर राहण्यास अनर्ह का ठरविण्यात येवू नये, याबाबतची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भायखळा येथील 'मोहम्मद बक्स बिल्डींग' या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत

**(४) * १३५५३४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील 'मोहम्मद बक्स बिल्डींग' या इमारतीचा पुनर्विकास गत १० वर्षे विकासकामुळे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने विकासकाला ५० कोटी रुपये म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे जमा करण्याचे आदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रक्कम भरण्यास कंपनी अयशस्वी ठरल्यास म्हाडाने प्रकल्प राबवून भाडेकरूंना नियमाप्रमाणे मासिक भाडेही देण्याचे आदेश न्यायालयाने दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर इमारतीच्या पुनर्विकासाची सद्यस्थिती काय आहे व कधीपर्यंत प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे ही खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

विकासकाने / ना-हरकत प्रमाणपत्र धारकाने रुपये ५० कोटी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे न भरल्यास मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करून कायद्यातील तरतुदीनुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु करावी, असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दि.१४.०३.२०१९ रोजी दिले आहेत. तथापि, विकासक /ना-हरकत प्रमाणपत्र धारकाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे रुपये ५० कोटी भरण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे तेथील भाडेकरू / रहिवाश्यांना म्हाडा मार्फत मासिक घरभाडे देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
(४) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने विकासकास / ना-हरकत प्रमाणपत्र धारकास प्रदान केलेली दि.०४.०२.२००९ व दि.२२.०५.२००९ रोजीची ना-हरकत प्रमाणपत्रे दि.१४.०३.२०१९ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रद्द केली आहेत. तसेच या मालमत्तेचे भुसंपादन करण्याची कार्यवाही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बेंबळा-यवतमाळ (जि.यवतमाळ) अमृत पाणीपुरवठा योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) * १३७४४६ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेंबळा-यवतमाळ (जि.यवतमाळ) अमृत पाणीपुरवठा योजनेमध्ये ३०२ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप मा.मुंबई उच्च

न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या जनहित याचिकेत करण्यात आल्याचे माहे, मार्च २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत निकृष्ट दर्जाचे पाईप वापरण्यात आले असून हे पाईप पाणी व हवा यांचा दाब सहन करू शकत नसल्याने पाईप फुटून येणाऱ्या पाण्यामुळे शेतपिकाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार संबंधीत दोषी कंत्राटदार व अधिका-यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत मंजूर यवतमाळ पाणीपुरवठा योजनेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका मार्च, २०१९ मध्ये दाखल झालेली आहे.

(२) • बेंबळा धरणातून टाकळी शिवारातील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत प्रस्तावित १७.२ किमी अशुध्द पाण्याच्या उर्ध्ववाहीनीचे काम माहे मे, २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आले होते.

• तथापि, सदर उर्ध्ववाहीनी कार्यान्वित करीत असताना तीन वेगवेगळ्या ठिकाणी पाईपलाईन फुटल्या आहेत. यामुळे काही शेतपिकांचे नुकसान झालेले आहे.

• परंतु संबधितांना वेळीच समाधानकारक नुकसानभरपाई पाईप पुरवठादाराकडून देण्यात आलेली आहे

(३) व (४) • या योजनेतील पाईपलाईन कार्यान्वित करता असतांना पाईप फुटल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांच्या गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथकामार्फत योजनेच्या कामाची गुणवत्ता तपासणी करण्यात आलेली आहे.

• या तपासणीमध्ये पुरवठा करण्यात आलेले पाईप हे उत्पादन प्रक्रियेतील सदोषतेमुळे भारतीय मानकाप्रमाणे नाही असा निष्कर्ष नोंदविण्यात आला.

• त्यानुसार सदर प्रयोजनार्थ वापरण्यात आलेल्या संपूर्ण पाईप्स संबंधित पाईप पुरवठादाराने स्वखर्चाने बदलवून देणे, नव्याने उत्पादीत पाईप्सची

तपासणी त्रयस्थ यंत्रणेने विनामूल्य करून देणे, तसेच अंथरलेल्या पाईप्सची जलदाब चाचणी संबंधित ठेकेदाराने स्वखर्चातून करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

• त्यानुसार एकुण १७.२० किमी पैकी ११.९७४ किमी नविन चांगल्या गुणवत्तेच्या पाईपचा पुरवठा करण्यात आलेला असून, त्यापैकी १०.९१३ किमी पाईप अंथरण्यात आलेल्या आहेत.

• तसेच, सदर योजनेतील सर्व कामे माहे सप्टेंबर, २०१९ पर्यंत गुणवत्तापूर्णरित्या पूर्ण करण्याच्या सूचना कार्यान्वयन यंत्रणेस देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मुंबईतील छत्रपती महाराज शिवाजी टर्मिनस येथील “हिमालय” पादचारी पूल कोसळून झालेला अपघात

**(६) * १३४८७० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे**

**(वरळी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व टाईम्स ऑफ इंडिया इमारतीला जोडणाऱ्या हिमालय पुलाचा काही भाग कोसळून १८ व्यक्तींचा मृत्यू झाला असून ३४ व्यक्ती गंभीर जखमी झाल्याचे दिनांक १४ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे संरचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्यात आलेले असतानाही सदर दुर्घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिमालय पूल दुर्घटनेत दोषी ठरलेल्या डी.डी.देसाईज असोसिएटेड या कंपनीला पुन्हा कुलाबा, ग्रॅण्डरोड, चंदनवाडी, भायखळा विभागातील पुलांच्या दुरुस्तीचे काम देण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला असल्याचे दिनांक २६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना तसेच जखमी व्यक्तींना कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, पुलांच्या दूर्घटना टाळण्यासाठी विशेष पथकांमार्फत राज्यातील सर्व पुलांच्या सुरक्षिततेचा आढावा घेणे तसेच पुलांच्या ठिकाणी २४ तास पूल निरीक्षक नेमण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मुंबईतील ११ पूल धोकादायक असून ६१ पूल दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असून धोकादायक असलेल्या किती पुलांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली व सदर कामे केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १४ मार्च, २०१९ रोजी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व टाईम्स ऑफ इंडिया इमारतीला जोडणाऱ्या हिमालय पुलाचा काही भाग कोसळून ७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, ३३ व्यक्ती जखमी झाल्या असल्याचे पोलीसांकडून प्राप्त अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

(२) सदर पुलाच्या संरचनात्मक अहवालामध्ये सदर पूल सुस्थितीत असल्याचे नमूद करण्यात आल्यामुळे त्याच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हिमालय पूल दुर्घटनेत दोषी ठरलेल्या कंपनीला सदर पुलाच्या दुर्घटनेनंतर कोणत्याही दुरुस्तीचे काम देण्यात आले नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• पुल विभागाच्या १ सेवानिवृत्त प्रमुख अभियंता, १ कार्यकारी अभियंता व १ सहाय्यक अभियंता यांना अटक करण्यात आली असून, कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता यांना निलंबित करण्यात आले आहे.

• उपरोक्त ३ अधिकारी तसेच १ उपप्रमुख अभियंता व अन्य १ कार्यकारी अभियंता अशा एकूण ५ कर्मचाऱ्यांविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

सदर दुर्घटनेतील मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख व जखमी व्यक्तींना प्रत्येकी रु. ५० हजार याप्रमाणे एकूण रु. ४५ लाख इतकी नुकसान भरपाईची रक्कम जिल्हाधिकारी, मुंबई यांच्या खात्यात मुख्यमंत्री निधी कक्षामार्फत वर्ग करण्यात आली असून, त्यापैकी रु. ३९ लाख इतकी रक्कम संबंधितांना अदा करण्यात आली आहे.

उर्वरित रकमेचे अधिदान जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरातील पुलांचे व फ्लायओव्हरचे पुन:श्च सर्वेक्षण करण्यात आले आहे.

शहर विभागातील पुलांच्या संरचनात्मक सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूल विभागामध्ये “प्रमुख पुल निरीक्षक” या पदाच्या नियुक्तीबाबत महानगरपालिकेमार्फत निर्णय घेण्यात आला असून, त्यांचेमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील सर्व पुलांचे निरीक्षण व दुरुस्तीची कामे करुन घेण्यात येणार आहेत.

(६) व (७) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरांतील सर्वेक्षणाअंती २९ पुल धोकादायक ठरविण्यात आले असून, ते पुल तात्काळ बंद ठेवण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूल विभागाकडून संबंधित सहाय्यक आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

सदर धोकादायक २९ पुलांपैकी ८ पुलांचे निष्कासन करण्यात आले असून, १३ पुल हे वाहतुक आणि पादचाऱ्यांच्या वापराकरिता बंद करण्यात आले आहेत. उर्वरित ८ पुल बंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

----------------

## मुंबई व परीसरात अंमली पदार्थांच्या व्यवसायाचे वाढते प्रमाण

**(७) * १३७५०४ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द-शिवाजीनगर (मुंबई) विभागात अंमली पदार्थांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असल्यामुळे विभागातील तरुण वर्ग व्यसनाधीन होत असून वडाळा येथील कोकरी आगार परिसरात लाखो रुपयांच्या गांजाची विक्री करणाऱ्या तिघांना दिनांक ११ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास वडाळा पोलीसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे येथील नौपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत लाखो रुपयांचे एफेड्रीन ड्रग्ज दिनांक १३ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारस जप्त केला असून येऊर, उपवन, मुंब्रा परिसरातही अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री व सेवन केले जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे, तसेच ठाणे जिल्ह्यातील नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रुपये ३ कोटी किंमतीचा २५ किलो एफेड्रिन दिनांक १६ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास पोलीसांनी

जप्त केला त्याचप्रमाणे वांद्रे येथील नॅशनल कॉलेज परिसरात तीन तरुणांना दिनांक १७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्या सुमारास खार पोलीसांनी अटक करुन ६१ लाख रुपये किंमतीचा दिड किलो एमडी ड्रग्जचा साठा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंधेरी आणि नवी मुंबई येथे आंबोली पोलीसांच्या विशेष पथकाने दिनांक ९ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास ३९ कोटी रुपयांच्या कोकेनच्या साठ्यासोबत इतरही मुद्देमाल जप्त केला असून कोकेन तस्करीप्रकरणी आंतरराष्ट्रीय टोळीत सहभागी असलेल्या चार विदेशी नागरिकांनाही पोलीसांनी अटक केली आहे, तसेच मुंबई उपनगरातील कांदिवली परिसरातील अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या कांदिवलीच्या युनिटने दिनांक २० एप्रिल, २०१९ रोजी वा त्या सुमारास अंधेरी परिसरातील वर्सोवा वाहतूक चौकी जवळील न्यू इंदिरानगर झोपडपट्टीजवळील परिसरात रुपये २ लाख ६७ हजार किंमतीचा ६७० ग्रॅम चरस जप्त केला, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील निर्मल पार्क येथे नायजेरियन ड्रग्ज तस्करांचा पाठलाग करताना भायखळा पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकावर तस्करांनी दिनांक १५ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास गोळीबार केला, त्या गोळीबारास प्रत्युत्तर देताना पोलीसांनी केलेल्या गोळीबारामध्ये ३ नायजेरियन व्यक्ती व ४ पोलीस जखमी झाले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दक्षिण मुंबईतील डॉकयार्ड रोड, वाडीबंदर, भायखळा, चिंचपोकळी, कॉटनग्रीन व काळाचौकी या परिसरात नायजेरियन तस्करांची ड्रग्जची तस्करी वाढलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार संबंधीत सर्व दोषींना व नायजेरियन ड्रग्ज तस्करांना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच अंमली पदार्थांच्या व्यवसायास प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

मानखुर्द, शिवाजीनगर परिसरात ०१ जानेवारी, २०१९ ते अद्यापपावेतो अंमली पदार्थ विरोधी कक्ष, घाटकोपर युनिटने मानखुर्द व शिवाजीनगर परिसरात ६ ताबा केसेस मध्ये १३ आरोपी अटक केले असून त्यांच्याकडून

१) १६८ ग्रॅम हेरॉईन अंदाजित किंमत रुपये १६,८०,०००/-

२) ४ किलो ४०० ग्रॅम गांजा, अंदाजित किंमत रुपये ८८,०००/-

३) कोडेन मिश्रित १०३४ बाटल्या अंदाजित किंमत रुपये २,०७,०००/-

४) १ किलो एम.डी. अंदाजे किंमत रुपये ४०,००,०००/- असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच दिनांक ०९.०३.२०१९ रोजी वडाळा टी.टी. पोलीस ठाणे वि.स्था.गु.नों.क्र.१४/१९, कलम ८(क) सह २०, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट, १९८५ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातील अटक ३ आरोपितांकडून ०६ किलो गांजा, अंदाजित किंमत रुपये २,४०,०००/- हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला.

(२) हे अंशत: खरे आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर या घटकाने दि.११.१२.२०१८ रोजी नौपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत जांभळीनाक्याकडुन टेंभीनाक्याकडे जाणाऱ्या रोडवर सी.आर. वाडीया दवाखान्याच्या समोर, ठाणे प. या ठिकाणी एका इसमास अटक करुन त्याचे कब्जातून रु. ६,२०,०००/- किंमतीचा १५५ ग्रॅम वजनाचा इफेड्रीन हा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आलेला आहे.

तसेच येऊर उपवन या ठिकाणी वर्तकनगर पोलीस ठाणे मध्ये अंमली पदार्थ जवळ बाळगणे व सेवन करणे याबाबत एकुण ५ गुन्हे दाखल असुन त्यामध्ये २० आरोपींना अटक केली आहे. त्यामध्ये ३ गुन्ह्यांमध्ये मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असुन २ गुन्हे पोलीस तपासावर आहेत.

मुंब्रा पोलीस स्टेशनच्या हद्दीत अंमली पदार्थ जवळ बाळगणे व सेवन करणे याबाबत एकुण ६ गुन्हे दाखल असुन त्यामध्ये एकुण १४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी एकुण रु. ११,२९,०००/- किंमतीचा चरस, गांजा जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये ४ गुन्ह्यांमध्ये मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असुन २ गुन्हे पोलीस तपासावर आहेत.

ठाणे ग्रामीण पोलीसांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे दिनांक १६.०३.२०१९ रोजी पहाटे टाकलेल्या छाप्यामध्ये २ इसम नामे योगेश रमणलाल शहा व सादेव वैजनाथ जमादार हे त्यांच्याकडील ऑटो रिक्षातून ३ कोटी रुपये किंमतीचे एफेड्रिन हा अंमली पदार्थ स्वत: जवळ बाळगून विक्री करण्याच्या दृष्टीने भाईंदर पूर्व येथील बंटास हॉटेल समोर आले असताना मिळून आले असून, त्यांचे विरुध्द नवघर पोलीस ठाण्यात गु.र.क्र.७२/१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ९-अ, २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

दिनांक १८.०४.२०१९ रोजी खार पोलीस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.र. क्र.७२/१९ कलम ८(क) सह २२, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल असून नमुद गुन्ह्यातील अटक आरोपितांकडून १ किलो ५२६ ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.) अंदाजित किंमत रुपये ६१,०४,०००/- हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १०.०२.२०१९ रोजी अंबोली पोलीस ठाणे वि.स्था.गु.नों. क्र.३८/२०१९, कलम ८(क) सह २२, २९ एन.डी. पी.एस. ॲक्ट, १९८५ अन्वये गुन्हा दाखल असून नमुद गुन्ह्यातील अटक ५ नायजेरियन आरोपितांकडून ६ किलो ४९२ ग्रॅम कोकेन अंदाजे किंमत रुपये ३८,९५,२०,०००/- हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.

दिनांक २० एप्रिल २०१९ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या कांदिवली युनिटने, इंदिरानगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई येथे धाड टाकुन आरोपी नामे अजीज नासीर अब्दुल वाडकर उर्फ मायकल, याच्या ताब्यातुन ६७० ग्रॅम हा २ लाख ६८ हजार किंमतीचा चरस व अंमली पदार्थ जप्त केला असून गु.र.क्र. २८/१९ कलम ८ (क) सह २० (ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५, अन्वये गुन्हा दाखल आहे.

(४) हे खरे आहे.

दिनांक १५.१२.२०१८ रोजी भायखळा पोलीस ठाणे, गु.र.नों.क्र.३४९/१८ कलम ३०७, ३३२, ३५३, १४१, १४३, १४७, १४८, १४९ भादंवि सह कलम ३, २५, २७ भाहका सह कलम ८(क), २१, २२ एन.डी.पी.एस. ॲक्ट, अन्वये गुन्हा दाखल असून नमुद गुन्ह्यातील १४ नायजेरियन आरोपितांकडून एकूण-

१) ५५० ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.), सुमारे ११० ग्रॅम हेरॉईन व ब्राऊन शुगर, ११ ग्रॅम कोकेन असा अंमली पदार्थ (अंदाजित किंमत रुपये २१,००,०००/-)

२) एक ३८ बोअर चे परदेशी बनावटीचे रिव्हॉल्व्हर, ३ जिवंत काडतुसे, एक रिकामी पुंगळी

३) एकूण १२ मोबाईल फोन्स

४) २ स्टीलचे बटन चाकू रोख रक्कम रुपये ४२,०००/- हे सामान जप्त करण्यात आले.

नमुद गुन्हयातील अटक आरोपितांनी गोळीबार केला असता प्रत्युत्तर म्हणून पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या गोळीबारात एकूण ३ नायजेरियन आरोपी व १ अधिकारी व ४ अंमलदार जखमी झाले. गुन्हा पुढील तपासावर आहे.

(५) व (६) हे खरे नाही.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष व पोलीस ठाण्याच्या पथकामार्फत दक्षिण मुंबईतील डॉकयार्ड रोड, वाडीबंदर, भायखळा, चिंचपोकळी, कॉटनग्रीन व काळाचौकी येथील परिसरात पोलीस अंमलदार साध्या वेषात तसेच गुप्त बातमीदारामार्फत पाळत ठेवुन वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

सन २०१८ मध्ये परदेशी नागरिकांविरुध्द १० गुन्हे नोंद करण्यात आले असुन त्यामध्ये २१ आरोपितांना व सन २०१९ मध्ये परदेशी नागरिकांविरुध्द ७ गुन्हे नोंद करण्यात आले असून त्यामध्ये १३ आरोपितांना आतापर्यंत अटक करण्यात आलेली आहे. नमुद कारवाईमुळे ड्रग्ज तस्करीला आळा बसलेला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील "पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती" च्या गैरव्यवहारासंबंधीच्या चौकशी अहवालाबाबत

**(८) * १४००५७ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ''पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती'' च्या गैरव्यवहाराची राज्य गुन्हे अन्वेषण शाखेच्या विशेष पथकाच्या वतीने सुरू असलेल्या चौकशीचा अहवाल तीन महिन्यात सादर करू असे आश्वासन मा.गृह राज्यमंत्री (शहरे) यांनी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते तथापि अद्यापही अहवाल सादर झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवाल सादर करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत तसेच केंव्हापर्यंत अहवाल सादर करण्यात येईल,

(३) अहवाल सादर झाला असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे मार्च, २०१७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत आश्वासन देण्यात आले आहे.

(२), (३) व (४) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापुर च्या गैरव्यवहारांची सखोल चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून करण्याबाबत शासन पत्र दिनांक २२/४/२०१५ अन्वये सुचना देण्यात आल्या आहेत. तद्नुसार पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीतील एकूण ३०६७ देवस्थानांची सन १९६९ ते २०१५ या कालावधीतील चौकशी करण्यात आली. सदर प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्यामुळे चौकशीस प्रदिर्घ कालावधी लागला आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरणाच्या चौकशीचे कामकाज पूर्ण झाले असून अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) भावाळे वाकीपाडा येथील सर्वे नं. ४६/३ मध्ये एका विकासकाने शेतक-याची जमीन हडप केल्याबाबत

**(९) * १३६६४३ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) भावाळे वाकीपाडा येथील सर्वे नं. ४६/३ मध्ये एका विकासकाने शेतक-याची जमीन हडप करून त्याठिकाणी अनधिकृत गोडावून उभारल्याने त्याच्याविरोधात पडघा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा दाखल करून अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार कार्यवाही करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी व संबंधीत विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

ठाणे ग्रामीण घटकात अथवा पडघा पोलीस ठाणे मध्ये तक्रार अर्ज प्राप्त नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका हद्दीतील नागरीकांचा पाणीप्रश्न सोडविण्याबाबत

**(१०) * १३५८१२ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील नागरीकांची पाण्याची समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिकेला मंजुर असलेल्या 'शाई' धरणाचे काम पूर्ण करावे यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री, आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे मागणी केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्याबाबत निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणाचे काम लवकरात लवकर सुरु करण्यासंदर्भात अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मागील १५ वर्षांपासून शाई धरण बांधण्याची मागणी आहे. ठाणे महानगरपालिकेच्या पाण्याच्या गरजेसाठी स्वतंत्र स्त्रोत म्हणून शाई धरणाचे बांधकामास सन २००५ मध्ये ठाणे महानगरपालिकेमार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील भविष्यातील वाढीव पाणी पुरवठ्याची गरज भागविण्यासाठी जलस्त्रोत विकास कार्यक्रम राबविण्याचे सन २००९ मध्ये ठरविण्यात आले होते. याकरीता आर्थिक गुंतवणूक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावी व महानगर क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांना घाऊक पाणी पुरवठा करावा, तसेच शाई प्रकल्प प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत सन २००९ मध्ये ठरविण्यात आले होते. तद्नंतर ठाणे महानगरपालिकेने शाई धरणाची प्रशासकीय मान्यता २००९ मध्ये रद्द केली.

या परिसरातील पाणी पुरवठ्यासाठी धरण प्रकल्पाचे बांधकाम कोकण पाटबंधारे महामंडळाकडून करत असताना शाई या पहिल्या टप्प्यातील धरणाऐवजी काळू या दुसऱ्या टप्प्यातील धरणाचे बांधकाम हाती घेऊन काळू प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शाई प्रकल्पाचा विचार करण्याबाबत कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने निर्णय घेतला.

शाई धरण प्रकल्पाच्या मागणीच्या अनुषंगाने जुलै, २०१६ मध्ये मा. पालकमंत्री, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेऊन ठाणे महानगरपालिकेसाठी शाई धरणाची आवश्यकता निश्चित करण्यात आली व धरण बांधकामाबाबत ठाणे महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा असे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर शाई धरण प्रकल्पासाठीच्या भूसंपादनातील अडचणी, प्रकल्पाचा अद्ययावत खर्च व त्यामधील आर्थिक सहभाग याचा अभ्यास करुन सदर प्रकल्पाचे काम प्राधान्याने हाती घेण्याची बाब पुन्हा तपासण्यात येईल.

-----------------

## विरार (जि.पालघर) येथे मांडवी पोलीस चौकीच्या हद्दीत सापडलेला स्फोटकांचा साठा

**(११) * १४००४४ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.पालघर) येथे मांडवी पोलीस चौकीच्या हद्दीतील चांदीपजवळ तानसा नदीकिनारी बेकायदा रेती उत्खनन करणाऱ्यांवर टाकलेल्या धाडीमध्ये २१ जिलेटीनच्या कांड्यांसह स्फोटकांचा साठा पोलीसांनी माहे मार्च, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्फोटकाच्या साठ्यात डिटोनेटर्स व जिलेटिन ही आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

२४ इलेक्ट्रॉनिक डिटोनेटर्स व ८ किलो ४०० ग्रॅम वजनाची सफेद रंगाची दाणेदार पावडर स्फोट घडविण्याच्या उपयोगाची आढळून आली आहे.

(३) सदर प्रकरणी चार आरोपी विरुध्द विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा क्रमांक १९२/२०१९ भा.दं.वी.स. कलम ३७९, ३४ सह स्फोटक पदार्थ अधिनियम कायदा कलम ४(१), ५ प्रमाणे दिनांक ०४/०३/२०१९ रोजी गुन्हा दाखल केला आहे. चारही आरोपींना दि.०९/०४/२०१९ रोजी अटक केली असून ते न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तानसा पाईपलाईन प्रकल्पबाधितांचे मुंबईत इतरत्र पुर्नवसन करण्याबाबत

**(१२) * १३४९०७ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तानसा पाईपलाईन प्रकल्पबाधितांना माहुल येथे प्रकल्पाव्यतिरिक्त मुंबईत इतरत्र घर/PAP सदनिका उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने गठीत केलेल्या समितीची आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बैठकीत "घर बचाओ घर बनाओ आंदोलन" समितीच्या प्रतिनिधींनी सर्व प्राधिकरणाकडून संकलित केलेली सूची सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीच्या प्रतिनिधींनी सादर केलेल्या सूचीनुसार सदनिकांच्या सद्य:स्थितीबाबत पूर्ण पडताळणी करून १५ दिवसात अहवाल सादर करावा व "घर बचाओ घर बनाओ आंदोलन" समितीने केलेल्या विनंतीनुसार विविध प्राधिकरणाकडून प्राप्त झालेले अहवाल तात्काळ उपलब्ध करून देण्याचे आदेश आयुक्तांनी मालमत्ता विभागास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अहवाल प्राप्त झाले आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ रोजी बैठक झाली हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) म्हाडा, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून प्राधिकरणांकडे उपलब्ध असलेल्या सदनिकांच्या सद्यस्थितीचा अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दारुच्या दुकानाचा परवाना मिळवून देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणुक

**(१३) * १३४८७६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारुच्या दुकानाचा परवाना मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवत रुपये १ कोटी ९२ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या राज्यमंत्र्यांवर न्यायालयाच्या आदेशाने माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात त्यांच्याविरुध्द कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार पूढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) २२ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद यांनी सी.आर.पी.सी. कलम १५६(३) अन्वये संबंधीतांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेशित केल्यानंतर

सर्वप्रथम पोलीस ठाणे क्रांती चौक, औरंगाबाद शहर येथे गु.र.क्र.८१/२०१९ कलम ४०६, ४२०, १२० (ब), ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा पुढील तपासकामी पोलीस ठाणे सिडको, औरंगाबाद शहर येथे वर्ग करण्यात आला. त्यानुसार पोलीस ठाणे सिडको, औरंगाबाद शहर येथे गु.र.क्र. १४१/१९ कलम ४०६, ४२०, १२० (ब), ३४ भादंवि अन्वये चार आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट एण्ड इंजिनियरींग या संस्थेत बनावट पदवी प्रमाणपत्र देण्यात येत असल्याबाबत

**(१४) * १३९२७४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील कळबीचौक येथे सुरु असलेल्या इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट एण्ड इंजिनियरीग या संस्थेत पैसे घेऊन बनावट पदवी प्रमाणपत्र वाटप केल्याची बाब माहे मार्च-२०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणामध्ये ठाणे पोलीसांनी संस्थेवर धाड टाकुन तीन आरोपींना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट पदवी प्रमाणपत्राचे वाटप करणारे रॅकेट नागपूर शहरामध्ये सक्रिय आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, नागपूर शहर आणि पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कोणतीही तक्रार वा त्या अनुषंगाने गुन्हे दाखल नाहीत.

(२) हे खरे आहे,

सदर प्रकरणी पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्या कार्यक्षेत्रातील परिमंडळ-३ मधील मानपाडा पोलीस ठाणे, डोंबिवली, येथे इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट एण्ड इंजिनियरीग येथे कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमाची परिक्षा न घेता सदर संस्थेत प्रवेश घेणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे कोणत्याही वर्षाचे मार्कशीट्स व प्रमाणपत्र / बोगस डिग्री पैसे घेवून वाटप केल्याबाबत ६ व्यक्तींविरुध्द गुन्हा रजि. नं.१४३/२०१९ भादवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर प्रकरणी नागपूर येथील ६ आरोपींना दिनांक ६/०३/२०१९ रोजी अटक करण्यात येवून त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, नागपूर शहर आणि पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कोणतीही तक्रार वा त्या अनुषंगाने गुन्हे दाखल नाहीत.

(४) मानपाडा पोलीस ठाणे, डोंबिवली, येथे गुन्हा रजि. नं.१४३/२०१९ भादवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून मा.न्यायालयात दिनांक ४/०५/२०१९ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कांजूर (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या ७०४ चौ.मी. क्षेत्रफळाच्या सुविधा भूखंडाबाबत

**(१५) * १३६२५६ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कांजूर (मुंबई) येथील ७०४ चौ.मी.क्षेत्रफळाच्या महानगरपालिकेच्या सुविधा भूखंडाचे विकास नियंत्रण नियमावली सन १९९१ मधील तरतूदी अन्वये औद्योगिक जागेचे निवासी व वाणिज्यीक असे बदल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या उद्यानालाही तात्पूरता रस्ता देण्यात आला असून तेथील मुख्य नाला वळवून नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मे.कल्पतरु या विकासकाने भूखंडावर बांधकाम करतांना बांधकामातील कमी उत्पन्न गटासाठी राखीव ठेवण्यात आलेली २० टक्के घरे बाजार भावाने विकली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विकासकाने लाल बहादूर शास्त्री रस्त्यापासून जाणारा मोठा नाला चौकोनी आकारात वळवून त्याच्या खाली वाहनतळ केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २२ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊन मे.कल्पतरु या विकासकावर व त्यांना नियमाबाह्य परवानगी देणा-या महानगरपालिकेच्या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) सदर ठिकाणी १८.३० मी. चा विकास नियोजन रस्ता विकासित होईपर्यंत लाल बहादुर शास्त्री मार्गापासून सुविधा भूखंडापर्यंत जाण्याकरिता विकासकाच्या जागेमधील ६ मी. रुंदीचा तात्पुरता हक्काचा पोहोच रस्ता (Temporary right of way) देण्यात आला आहे.

नाल्याच्या भौगोलिक व पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करुन महानगरपालिकेच्या पर्ज्यन्य जलवाहिन्या विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार, सदर ठिकाणी अस्तित्वात असलेला नाला २.० मी. रुंद करुन भूखंडाच्या सीमेलगत वळविण्यात आलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

पावसाळी पाण्याचा निचरा जलदगतीने होण्यासाठी वळणाच्या ठिकाणी सदर नाल्याची रुंदी ३.० मी. ठेवण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाने दिलेल्या अभिप्रायामध्ये कोणतीही अनियमितता नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रस्तावित भूखंडाच्या एकूण निवासी वापराकरिता असणाऱ्या क्षेत्रफळापैकी २०% क्षेत्रफळामध्ये ५० चौ.मी. पर्यंत क्षेत्रफळ असणाऱ्या सदनिका बांधल्या जातील या अटीवर निवासी इमारतीच्या आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे.

तसेच, मंजूर इमारतींस बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २४.०१.२०१८ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकल्पातील निवासी सदनिकांना विकास नियंत्रण नियमावली १९९१ नुसार वाहनतळाची सुविधा देण्यात आली आहे.

सदर वाहनतळ हे नाल्याखाली नसून, भूखंडावरील इमारतीच्या तळघरात स्थित असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५), (६) व (७) अशा स्वरुपाचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदने बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत लोकप्रतिनिधींना अवगत करण्यात आले आहे.

-----------------

## कोकरी आगार (वडाळा, मुंबई) येथील संक्रमण शिबिरात अनधिकृत जल जोडण्या केल्याबाबत

**(१६) * १३६६६० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा येथील कोकरी आगार येथील संक्रमण शिबिरात पाणीमाफीयांनी अनेक ठिकाणी मुख्य जलवाहिन्यांवर प्रशासनाच्या संगनमताने अनधिकृत जोडण्या केल्या असल्याचे दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जोडण्यांमधून लाखो लिटर पाण्याची चोरी होत असून सदर प्रकार सर्रासपणे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील पाणीमाफीयांवर व संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१), (२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) बांधण्यात आलेल्या कोकरी आगार संक्रमण शिबीरामध्ये अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या घुसखोरांची जलजोडणी एमएमआरडीएच्या विनंतीनुसार खंडीत करण्यात आली आहे.

सन २०११ ते सन २०१८ या कालावधीत स्थानिक पोलीस बंदोबस्तात सदर परिसरातील एकूण १०२० जलजोडण्या खंडीत करण्यात आल्या आहेत.
माहे एप्रिल, २०१९ मध्ये सदर परिसरातील १६ अनधिकृत जलजोडण्या महानगरपालिकेमार्फत खंडीत करण्यात आल्या आहेत.

दिनांक ०१.०१.२००० नंतरच्या झोपड्यांना पाणी पुरवठा करण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार, दिनांक ०१.०१.२००० नंतरच्या गाळा / झोपडपट्टीधारक यांचेकडून जलजोडणीकरिता प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यांना जलजोडणी देण्यात येते.

सदर ठिकाणी नवीन जलजोडणीकरिता प्राप्त एकूण १८८ रहिवासी गटांच्या अर्जांपैकी १३५ अर्जांवर कार्यवाही करुन त्यांना जलजोडणी परवानगी देण्यात आली आहे.

त्यानंतर विहित अटींची पूर्तता केल्यानंतर आजपर्यंत ११७ रहिवासी गटांना जलजोडण्या देण्यात आल्या आहेत.

-----------------

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरास वारणा नदीतून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१७) * १३८६८५ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरास वारणा नदीतून पाणीपुरवठा करण्यासाठी अमृत योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या रुपये ७०.३० कोटी खर्चाची योजना उपसा केंद्र असलेल्या गावातील ग्रामस्थांच्या विरोधामुळे प्रलंबित असून शहरात सध्या पाणी टंचाई निर्माण होवून ७ दिवसातून एकदा पाणीपुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने योजनेचे उपसा केंद्र इतरत्र करण्यास व योजनेचे काम सुरू करण्यास ग्रामस्थांनी पुन्हा विरोध केल्यामुळे योजनेचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे काम सुरु करण्यासाठी इचलकरंजी नगरपरिषदेने वारवांर जिल्हा प्रशासनाकडे पोलीस बंदोबस्ताची मागणी करूनही बंदोबस्त देण्यात आलेला नसल्यामुळे काम सुरु होवू शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेचे काम सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) • केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेतून इचलकरंजी शहरासाठी रु.७०.३० कोटी किमतीची वारणा नदी उद्‌भवावरुन पाणी पुरवठा योजना मंजूर आहे.

• या योजनेतील दानोळी नदीवरील उद्‌भवाच्या कामास ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे काम सुरु करता आले नाही.

• सद्यस्थितीत कृष्णा योजनेवरुन इचलकरंजी शहरास २-३ दिवसातून पाणी पुरवठा केला जात असल्याचा अहवाल मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद यांनी सादर केला आहे.

(२) • मा.पालकमंत्री, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली दि.३१.०५.२०१८ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीमध्ये दानोळी येथील उद्‌भवाऐवजी कोथळी उद्‌भवावरुन योजना आखण्याच्या सुचना देण्यात आल्या.

• तथापि, कोथळी येथील स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे तेथील कामही अद्याप सुरु करता आले नाही, हे खरे आहे.

(३), (४) व (५) • कोथळी येथे उद्भवावरुन योजनेचे काम सुरु करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे पोलीस बंदोबस्ताची मागणी करण्यात आलेली नसल्याबाबतचा अहवाल इचलकरंजी नगरपरिषदेने सादर केला आहे.

• वारणा नदीवरील दानोळी व कोथळी या दोन्ही उद्भवासाठी स्थानिक नागरिकांचा विरोध कायम असल्याने या योजनेचे काम अद्याप सुरु होऊ शकलेले नाही.

• दरम्यानच्या कालावधीत इचलकरंजी शहरासाठी कृष्णा उद्भवावरील पाणी पुरवठा योजनेच्या बळकटीकरणाचा रु.१६.९८ कोटींचा प्रकल्प महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत दि.३१.१२.२०१८ रोजी मंजूर करण्यात आला असून, या कामाचे कार्यादेश देण्यात येत आहेत.

-----------------

## कर्मभूमी मार्केटींग प्रा.लि. कंपनीने नाशिक शहरातील नागरिकांची केलेली फसवणुक

**(१८) * १३९२४४ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे कर्मभुमी मार्केटींग प्रा.लि., कंपनीने अधिक रक्कमेचा परतावा देण्याचे अमिष दाखवुन नाशिक शहरातील नागरीकांची लाखो रुपयांची फसवणुक केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु कंपनीच्या संचालकांविरुध्द स्थानिक पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदरहु कंपनीच्या संचालकांनी एकुण किती रुपयांचा अपहार केलेला आहे व चौकशीनुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी कर्मभुमी मार्केटींग प्रा.लि. कपंनीने फिर्यादी व इतर गुंतवणुकदारांची रू. ५५,०५,८१७/- ची फसवणूक केल्याप्रकरणी प्राप्त फिर्यादीवरून गंगापूर पोलिस स्टेशन, नाशिक येथे एकुण १० आरोपींविरूध्द गु.र.नं. १०/२०१९ भा.द.वि. कलम ४०६, ४२०, ३४, आणि महाराष्ट्र ठेविदारांचे हितसंरक्षण (एमपीआयडी) अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कंपनीचे संचालक यांना दि.२४.०३.२०१९ रोजी अटक करण्यात आली होती. तथापि मा.न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला आहे. तसेच इतर आरोपींनी मा.न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केले असून सदरील अर्ज मा.न्यायालयात सुनावणीस प्रलंबित आहेत. सदर गुन्हा तपासावर आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## कोल्हापूर शहराला काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईनमधून पाणी पुरवठा करण्याबाबत

**(१९) * १३८४९९ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहराला काळम्मावाडी धरणातून थेट पाईपलाईनमधून पाणी पुरवठा करण्याच्या योजनेचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेला दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ रोजी मंजूरी दिली तेव्हा सदर योजनेची किंमत रुपये ४८३ कोटी होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेला दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही हे काम अत्यंत संथ गतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हे काम किती कालावधीत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • केंद्र शासनाच्या यु.आय.डी.एस.एस.एम.टी. कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर शहरासाठी काळम्मावाडी धरण जलाशयातून पाणी पुरवठा योजनेला माहे डिसेंबर,२०१३ मध्ये केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.

• सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) सदर योजनेची प्रशासकीय मंजूर किंमत ही रु.४२५.४१ कोटी इतकी आहे.

(३) व (४) सदर प्रकल्पासाठी आवश्यक जागांच्या उपलब्धता तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, वन्यजीव विभाग, वन विभाग, जलसंपदा विभाग यांच्या परवानग्या मिळविण्यासाठी कालावधी लागला. त्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेने सदर प्रकल्पाच्या कामास आतापर्यंत एकुण २ वेळा मुदतवाढ दिली आहे.

• कोल्हापूर महानगरपालिकेने दुसरी मुदतवाढ रु.५०,०००/- प्रतिदिन दंड आकारणीसह दि.३१.१२.२०१९ पर्यंत दिली आहे. आतापर्यंत योजनेचे ७२% काम पुर्ण झालेले आहे.

• तथापि, याबाबत शासनस्तरावरुन प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेण्यात आला असून प्रकल्पातील उर्वरीत कामे कालबध्द पूर्ण करण्याबाबत सुयोग्य नियोजन करुन प्रकल्पाची कामे सप्टेंबर, २०१९ अखेर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मुंबईतील २४ वॉर्ड मध्ये आरोग्य विभागाने केलेल्या तपासणीत सरबताचे व बर्फाचे नमुने दुषित आढळून आल्याबाबत

**(२०) * १३४९७२ अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान मुंबईतील २४ वॉर्डातील सरबताचे नमुने तपासले असता त्यापैकी ८१ टक्के नमुने दुषित असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिंबू सरबताच्या २८० नमुन्यांपैकी २१८ नमुने, उसाच्या रसाच्या ३०३ नमुन्यांपैकी २६८ आणि बर्फाच्या ३८५ नमुन्यांपैकी ३०० नमुने दुषित आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाप्रकारे ऐन उन्हाळ्यात दुषित खाद्य पदार्थ व पेय पदार्थ विकणा-या फेरीवाल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईत सरबतासाठी वापरण्यात येणारे पाणी व बर्फ यांचे नमुने तपासण्यात आले असता ८१% नमुने दुषित असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) लिंबू सरबतासाठी वापरण्यात येणारे पाणी व बर्फाच्या नमुन्यांपैकी २१८, ऊसाच्या रसासाठी वापरण्यात येणाऱ्या बर्फाच्या ३०३ नमुन्यांपैकी २६८ आणि बर्फाच्या ३८५ नमुन्यांपैकी ३०० नमुने दुषित आढळून आले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४१५ व ४१६ मधील तरतुदीनुसार नियमितपणे कारवाई करण्यात येते.

त्यानुसार दुषित खाद्य पेय / पदार्थ विकणाऱ्या फेरीवाल्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली / येत आहे:-

• दिनांक १ एप्रिल, २०१९ ते १५ एप्रिल, २०१९ या कालावधीत ८०१२ फेरीवाल्यांवर कारवाई करुन २१,४६३ किलो उघड्यावरील खाद्यपदार्थ, ३६,०५४ लिटर सरबत व १,१६,८२३ किलो बर्फ जप्त करुन नष्ट करण्यात आले.

• फेरीवाल्यांकडील दुषित खाद्यपदार्थ व पेय पदार्थ नियमितपणे जप्त करुन नष्ट करण्याची कारवाई सुरु आहे.

• सदर मोहिम अधिक प्रभावीपणे राबविण्याकरिता आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना लिंबू सरबत, ऊसाचा रस, फळांचा रस व बर्फाचे गोळे या व्यावसायिकांवर संयुक्त कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

-----------------

## कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या रुग्णालयात सर्पदंशावरील औषधा अभावी एका मुलाचा झालेला मृत्यू

**(२१) * १३६७९३ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या रुग्णालयात सर्पदंशावरील औषध नसल्यामुळे एका ६ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १२ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासूमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बऱ्याच शासकीय रुग्णालयात सर्पदंशावर लागणारे औषध नसल्यामुळे औषधाविना रुग्णांचा मृत्यू होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयात सर्पदंशावरील औषधांचा पूरवठा त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • कु. स्वरा प्रमोद वाघमारे या ६ वर्षीय लहान मुलीस एकापेक्षा जास्त ठिकाणी सर्पदंश झाल्यामुळे दि. १२ एप्रिल, २०१९ रोजी सकाळी ११.४० वाजता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शास्त्रीनगर सामान्य रूग्णालयात दाखल केले होते.

• सदर रूग्णास सर्पदंशावरील लस व इतर आवश्यक इंजेक्शन व सलाईन देऊन प्रथोमपचार सुरू करण्यात आले, तथापि रूग्णाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्यामुळे त्यास दुपारी १२.१५ वाजता छत्रपती शिवाजी रूग्णालय, कळवा येथे संदर्भीत करण्यात आले.

• सदर रूग्णाचे नातेवाईक यांनी रूग्णास कळवा येथे न नेता खाजगी रूग्णालयात दाखल केले व तेथे उपचार सुरू असतांना सायंकाळी ७.३० वाजता रूग्णाचा मृत्यु झाला, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रूक्मिणीबाई, शास्त्रीनगर व इतर लहान दवाखान्यांमध्ये सर्पदंशावरील औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

• राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत असलेल्या आरोग्य संस्थांमध्ये सन २०१८-१९ मध्ये एकूण ४२,९९८ सर्पदंशावर औषधोपचार करण्यात आले आहेत.

• मे, २०१९ अखेर सर्पदंशावरील लसीचा एकूण ३,५७,६४८ इतका साठा शिल्लक असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# लोअर परळ येथील मे.दर्शन ग्रुप या विकासकाने राजू बाबाजी चाळीच्या पुनर्विकासात केलेल्या करारनाम्यातील कामांची पुर्तता न केल्याबाबत

**(२२) * १३४८७४ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागातील प्रभाग क्र. १९५ मधील सी.एस.क्र. ४४२, लोअर परळ डिव्हिजन, शंकरराव नराम पथ येथील राजू बाबाजी चाळीची पुनर्विकास योजना नियमावली ३३(७) अंतर्गत करण्यासाठी मे. दर्शन ग्रुप या विकासकासोबत चाळीतील रहिवाशी, मालक यांनी दिनांक २९ डिसेंबर, २००६ रोजी वा त्या सुमारास करार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.दर्शन ग्रुप या विकासकाने पुनर्रचित इमारतीचे निकृष्ट काम केले असून दिनांक २४ एप्रिल, २०१२ रोजी वा त्यासुमारास रहिवाश्यांना या नवीन इमारतीतील सदनिकांचा ताबा दिल्यापासून आजमितीपर्यंत करारनाम्यातील कामांची पुर्तता करण्यास हेतूपुरस्सर विलंब करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक रहिवाश्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि म्हाडाकडे लेखी तक्रार केली असतानाही महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभाग (शहर) यांनी विकासकाच्या विक्री घटक इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि गत ७ वर्षांपासून या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत केलेल्या करारनाम्यातील कामांची पुर्तता करण्यास विलंब करणाऱ्या विकासकावर तसेच या विकासकास पाठीशी घालणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिका आणि म्हाडातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विषयांकित पुनर्रचित इमारतीमधील काही गाळ्यांमध्ये पाण्याच्या गळतीबाबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. पुनर्वसन इमारतीतील सर्व सदनिकांचा ताबा गंधर्व दर्शन सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे दिला असल्याचे व करारपत्रातील सर्व अटी व शर्तींची पुर्तता केली असल्याचे विकासकाने त्यांच्या दि.१७.११.२०१७ व दि.३१.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास कळविले आहे. तथापि, सदर इमारतीतील ०७ भाडेकरु / रहिवाश्यांनी संस्थेकडून अद्यापपर्यंत पुनर्वसन गाळयांचा ताबा घेतलेला नाही. याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.१६.१.२०१३ व ०५.१०.२०१५ रोजी आदेश देवून सुध्दा तेथील भाडेकरू / रहिवाशी यांनी पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचा ताबा घेतलेला नाही. याप्रकरणी मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचे स्तरावर सुनावणी आयोजित करून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याबाबत विकासक व तक्रारदार यांना कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे कळविले आहे की, त्यांच्याकडे याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार विकासक व वास्तुविशारद याच्याकडून खुलासा मागविण्यात आला होता. त्याचप्रमाणे राजु बाबाजी को. ऑप. हौ. सो. यांनी विकासकास करारनाम्यानुसार पुनर्वसन इमारतीचे काम झाल्याने ना-हरकत प्रमाणपत्र अदा केलेले असून त्याचे सदर पुनर्वसन प्रकल्पासाठी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. विकासकाने/ वास्तुविशारदाने सादर केलेल्या पर्यवेक्षक / वास्तुविशारद/ संरचनात्मक अभियंता याचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र तसेच मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचे ना-हरकत प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्रे घेतल्यानंतरच दि.१७.०३.२०१८ रोजी विक्रि घटकाच्या इमारतीला भागशः भोगवटा प्रमाणपत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून देण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयात मुंदडा चिटफंडामध्ये गुंतवणूक केलेल्या नागरिकांची झालेली फसवणुक

**(२३) * १३५४०५ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात सर्वसामान्य नागरिकांनी बिटकॉईन, भिशी, चिटफंडमध्ये जादा परताव्याच्या अपेक्षेने गुंतवणुक केली, तथापि संतकृपा मार्केटमधील मुंदडा चिटफंडामध्ये गुंतविलेल्या गुंतवणुक धारकांची मुंदडा चिटफंडने कोट्यवधी रुपयांची फसवणुक केल्याचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये अनेक शासकीय कर्मचारी व व्यापारी यांनी गुंतवणूक केली असुन याप्रकरणात श्री.अमित भारद्वाज याला पोलीसांनी अटक केली आहे व त्याच्यावर देशभरात २५ हून अधिक गुन्हे दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व तद्नुसार संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मुंदडा चिटफंड कपंनीने फिर्यादी व इतर गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी प्राप्त फिर्यादींवरून सदर प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाणे, नांदेड येथे एकुण ४ आरोपींविरूध्द भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४६८, १२० (ब), ३४ आणि चिट फंड अधिनियम १९८२ चे कलम ४, ५, ११, ७९ नुसार एकुण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यातील ३ आरोपी फरार आहेत तर एका आरोपीस मा.न्यायायालयाने अंतरिम अटकपुर्व जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्हयांचा तपास चालु आहे.

मुंदडा चिट फंड संबंधाने दाखल ७ गुन्हयात अद्याप पर्यंतच्या तपासात अमित भारव्दाज याचा संबंध दिसून आलेला नाही. तथापि अमित भारव्दाज सह एकुण ७ आरोपींविरुध्द गेन बिटकॉइन डॉट कॉम या संकेतस्थळाच्या

आधारे पाँझी स्कीमव्दारे गुंतवणुकदारांची फसवणुक केल्यासंबधाने प्राप्त फिर्यादीवरून पोलीस स्टेशन विमानतळ नांदेड येथे गु.र.नं २०/२०१८ कलम ४०६,४२०,२०१,३४ भा.दं.वि सह कलम ६६ (डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० व एम.पी.आय.डी ॲक्ट १९९९ च्या कलम ३ अन्वये स्वतंत्र गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी ५ आरोपींना अटक करण्यात आली असून, आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा सद्या न्यायप्रविष्ठ असून फरार आरोपींबाबत अधिक तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील महिलांवरील अत्याचारांच्या घटनात वाढ झाल्याबाबत

**(२४) * १३८९९९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून सन २०१३ ते २०१८ या कालावधीत बलात्कार व विनयभंगाच्या गुन्हयात अनुक्रमे ८३ टक्के व ९५ टक्के इतकी वाढ झाली असून, याच काळात दंगलीच्या गुन्हयात ३६ टक्क्यांनी, तर लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या तक्रारीत १९ टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती प्रजा फाऊंडेशनने त्यांच्या वार्षिक अहवालातून दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास नमूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत ५ वर्षापूर्वी नोंदविण्यात आलेल्या ४३२ बलात्काराच्या घटनांत सन २०१८-१९ मध्ये वाढ होऊन ७९२ इतकी, विनयभंगाच्या प्रकरणात १ हजार २०९ वरुन २ हजार ३५८, पॉस्को अंतर्गत ८९१ वरुन १ हजार ६२ इतकी वाढ झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अत्याचाराच्या घटनांमध्ये लहान मुलींचे प्रमाण अधिक असून मुंबईतील महिला असुरक्षीत समजत असल्याची बाब देखील प्रजा फाउंडेशनच्या अहवालात नमूद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गुन्हेगारीमध्ये वाढ होण्यास अपूरे मनुष्यबळ व पोलीस दलात आवश्यकतेपेक्षा २२ टक्के मनुष्यबळ कमी असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महिलांवरील होत असलेल्या अत्याचाराच्या व छेडछाडीच्या प्रकरणांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०१३ ते सन २०१८ या कालावधीतील संबंधित गुन्ह्यांची सांख्यिकीय माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| गुन्हयाचा प्रकार | सन २०१३ | | सन २०१४ | | सन २०१५ | | सन २०१६ | | सन २०१७ | | सन २०१८ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दाखल | उघड | दाखल | उघड | दाखल | उघड | दाखल | उघड | दाखल | उघड | दाखल | उघड |
| बलात्कार (भा.द.वि.क. ३७६) | ३९४ | ३७१ | ६१० | ५५५ | ७१२ | ६४३ | ७१२ | ६३२ | ७५१ | ६८४ | ८८९ | ८३३ |
| विनयभंग (भा.द.वि.क. ३५४) | ११६१ | १०७० | १६१६ | १४३४ | २००८ | १६५० | २१८० | १७४८ | २२६८ | १८७९ | २५८६ | २२०२ |
| दंगल | ३५९ | ३३४ | ४१२ | ३८६ | ४०० | ३३८ | ४७६ | ४०९ | ४४१ | ३७४ | ५४५ | ४६५ |
| बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा खालील गुन्हे | ........ | ........ | ८१३ | ७६२ | १०२६ | ९७१ | ९६४ | ९०१ | ११२८ | १०४१ | १२१० | १०७७ |

(४) बृहन्मुंबई पोलीस मुली व महिला यांच्यावरील अत्याचाराबाबतचा प्रत्येक गुन्हा अत्यंत गांभिर्याने घेऊन गुन्हा नोंदविण्यापासून त्याचा सखोल तपास व दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करणेपर्यंतची सर्व प्रक्रिया अत्यंत गांभिर्याने हाताळण्यात येते. यावर अपु-या मनुष्यबळाचा कोणताही परिणाम होत नाही.

(५) राज्यातील महिलांवर होणा-या अत्याचाराला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना खालीलप्रमाणे आहे-

• महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी महिला अत्याचार प्रतिबंधक विभागाची स्थापना करण्यात आली आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक हे विभागाचे प्रमुख आहेत.

• महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याकरीता राज्यात २७ विशेष न्यायालये व २५ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

• पोलीस आयुक्तालये / जिल्हयांमध्ये महिला सुरक्षा समित्या व महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

• बलात्कारासारख्या गंभीर गुन्हयांचा तपासाची कार्यपध्दती बाबतच्या मार्गदर्शक सुचना सर्व पोलीस घटकांना वितरीत केलेल्या आहेत.

• हुंडाबळीकरीता प्रतिबंधात्मक उपाय प्रत्येक जिल्हयात दक्षता समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

• छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पायी पेट्रोलिंग, शाळा कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना,नाकाबंदी, महिला सुरक्षा व छेडछाड पथके तयार करण्यात आली आहेत.

• मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली विशाखा निर्णयाप्रमाणे पोलीस घटकांमध्ये तक्रार समित्या (Complaint Committees) स्थापन करण्यात आल्या आहेत. कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा-२०१३ देखील अंमलात आला आहे.

• महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तपासासाठी आणि त्यांचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरावर दि.१२/१०/२०१७ च्या शासन निर्णयानुसार विशेष पथके गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

• राज्यात, मुंबईसह पुणे शहर, ठाणे शहर, नागपूर शहर, पुणे ग्रामिण, यवतमाळ, अहमदनगर येथे Investigation Units for Crime Against Women (IUCAW) स्थापन केली आहेत.

• दिनांक ३१.०३.२००८ रोजी राज्य गुन्हे अन्वेषण विभागात अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात १२ घटकांमध्ये केंन्द्र शासन व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली स्वतंत्र अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

• समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आली आहेत.

• मा.धर्माधिकारी समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार रेल्वेस्टेशन परिसर व एस.टी. स्टॅन्ड येथे एकुण ३६४ ठिकाणी महिला मदत केंन्द्रे सुरु करण्यात आली आहेत.

• मुंबई, ठाणे व नवी मुंबई क्षेत्रातील संकटातील महिलांच्या मदतीकरिता टोल फ्रि हेल्पलाईन क्र. “१०३” व उर्वरित क्षेत्राकरिता “१०९१” सुरु करण्यात आली आहे. रेल्वे पोलीस घटक, मुंबई व पुणे ९८३३३३११११, नागपुर ०७१२-२७४३९८४ व बहन्मुबई पोलीस घटकात २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाईन सेवा कार्यरत आहे. याशिवाय www.mumbaipolice.org व comcell. mum.crime@mahapolice.gov.in या वेबसाईटवर online तक्रार करता येते.

• महिलांवरील बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या अत्याचाराच्या गुन्हयामधील आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलित कायदयात सुधारणा करुन शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१३ (२०१३ चा अधिनियम क्र.१३) पारित केला आहे.

• Criminal Law Amendment No.२ of २०१८ नुसार बलात्कारांच्या गुन्ह्यांच्या शिक्षेत केलेली वाढ व तपासाबाबतच्या नवीन सुधारणांबाबतच्या सूचना दि.०९/०७/२०१८ रोजीच्या परीपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आहेत.

• माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षेच्या उपाययोजना सुचविण्यासाठी दि.२७/०७/२०१७ च्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आली आहे.

• राज्यात दि.०१ जुलै, २०१५ ते दि.३१ जुलै, २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ५ ऑपरेशन मुस्कान/स्माईल मोहिमेतंर्गत एकुण २०११२ हरवलेल्या बालकांचा शोध लावण्यात आलेला आहे.

• केंद्र शासनाच्या मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार कार्यक्रमाची मुंबईत अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (जि.रायगड) एम.आय.डी.सी.परिसरातील केमिकल कंपनीमधील स्फोटात कामगाराचा झालेला मृत्यु

**(२५) * १३८०१४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील तळोजा एम.आय.डी.सी.च्या परिसरातील घोट गावाच्या शेजारी असलेल्या एम.एस.आर.बायोटेक अँड न्युट्रीशयन लि. या केमिकल कंपनीत दिनांक १६ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास पॅकिंगचे व फिलटरचे काम सुरु असताना अचानक भिषण स्फोट होवून आग लागली असून त्यामध्ये एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीमध्ये कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोऩातून कोणत्याच सुविधा नाहीत तसेच या कंपनीतील कामगारांचा विमा ही उतरविण्यात आलेला नसून त्याचा सी.एस.आर. ही भरलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घोट गावाच्या परिसरात असलेल्या कंपनीमध्ये स्फोट होऊन आग लागण्याची ही दुसरी घटना असून तळोजा एम.आय.डी.सी. मध्ये मागील सहा महिन्यामध्ये पाच ते सहा वेळा आग लागण्याचे प्रकार घडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार एम.एस.आर.बायोटेक अँड न्युट्रीशयन लि. या केमिकल कंपनीच्या व्यवस्थापनाविरूध्द कारवाई करण्याबाबत तसेच स्फोटात मृत्यु पावलेल्या कामगाराच्या कुटुंबाला व जखमी कामगारांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे,
(२) कंपनीतील कामगारांना सुरक्षिततेच्या सुविधा दिलेल्या नव्हत्या हे खरे आहे. तसेच कंपनीतील कामगारांचा विमा उतरविलेला नव्हता हे ही खरे आहे.
(३) यापूर्वी दिनांक २९/१०/२०१८ रोजी मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि., तळोजा या कारखान्यात स्फोट होऊन एक कामगार जखमी झाला होता. मागील सहा महिन्यात तळोजा एमआयडीसीत आग लागण्याच्या तीन घटना घडलेल्या आहेत.
(४) या कारखान्यात दिनांक १६/१२/२०१८ रोजी PQD हे पावडर स्वरुपातील मटेरीयल चाळणीतून चाळून पँकींग करण्याचे काम सुरु असताना अचानक स्फोट होऊन आग लागली व या आगीत एका कामगाराचा मृत्यू झाला.

या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीत या कारखान्यात दोन कामगार कामावर ठेवून PQD हे धोकादायक पावडर चाळून पॅकींग करण्याची उत्पादन प्रक्रिया करण्यात येत होती. PQD पावडर ही स्फोटक स्वरुपाची असल्यामुळे या आस्थापनेस कारखाने अधिनियमांच्या तरतुदी लागू होतात. परंतू चौकशीत कारखाना विना परवाना चालत असल्याचे आढळून आले. त्याकरिता महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ४(१) व ४(४) च्या भंगाबाबत, तसेच कारखान्यात PQD हे धोकादायक (ज्यामुळे स्फोट होऊ शकतो असे) मटेरिअल हाताळताना आवश्यक ती काळजी न घेतल्याने महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ७० च्या भंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरुद्ध मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग रायगड यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे. मृत कामगाराच्या वारसांना व्यवस्थापनाने मा.कामगार न्यायालयामार्फत रु.८,९८,०२०/- एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून दिलेली आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील मानपाडा रस्त्यावरील प्रथमेश ज्वेलर्सच्या मालकाने भिशीच्या योजनेतून नागरीकांची केलेली फसवणूक

**(२६) * १३७५८५ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवलीतील (जि.ठाणे) मानपाडा रोडवरील प्रथमेश ज्वेलर्सचे मालक श्री.अजित कोठारी यांनी भिशीच्या योजनेतून कोट्यवधी रुपये जमा करुन अनेक नागरीकांची फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात ९ जणांनी तक्रारी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीत ज्वेलर्सच्या मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी डोंबिवली पोलीस ठाणे येथे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी डोंबिवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३८४/२०१८ भा.दं.वि. कलम ४०६, ४२० सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९, कलम ३ अन्वये फिर्यादी व ५४ साक्षीदार यांच्या फसवणूक प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरहू गुन्हयातील आरोपी याने मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिन अर्ज केला होता. सदरचा अटकपूर्व जामिन अर्ज फिर्यादी व साक्षीदार यांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम परत करण्याच्या अटीवर मा. न्यायालयाने मंजूर केला आहे.

मा.न्यायालयाच्या आदेशान्वये आरोपी याने फिर्यादी व साक्षीदार यांचे दागिने व रोख रक्कम त्यांना परत केलेले आहेत.

सदर प्रकरणी दोषारोपपत्र दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याबाबत

**(२७) * १३४८९६ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याकरिता शासनाने समूह विकास योजना जाहीर केली परंतु त्या योजनेमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या हितांच्या अनेक बाबींचा अंतर्भाव नसल्याने सदरच्या योजनेस ग्रामस्थांचा विरोध असून नवी मुंबई क्षेत्रातील लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त आणि त्यांच्या संघटनांनी याबाबत हरकती व सूचना दिलेल्या असून सन २०१५, २०१६, २०१७ व २०१८ मध्ये अनेकवेळा निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे डिसेंबर, २०१५ पर्यंतची सर्वच बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतल्याने नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी केलेली सर्वच बांधकामे नियमित होण्याकरिता ग्रामस्थांशी चर्चा करून मूळ गावठाणाबरोबरच विस्तारित गावठाणातील प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी धारण केलेल्या महसुली जमिनीचे सर्वेक्षण करून त्यांना मालकी हक्क देण्यात यावा तसेच प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या हिताचा निर्णय घेऊन प्रकल्पग्रस्तांना दिलासा द्यावा म्हणून दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री, नगरविकास, प्रधान सचिव नगरविकास-१ यांना निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या हिताच्या बाबींचा अंतर्भाव नसलेली योजना ग्रामस्थांवर लादण्याचा प्रयत्न झाल्यास त्यास कायम विरोधच राहील अशी भावना सर्व ग्रामस्थांमध्ये पसरलेली असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) नवी मुंबईतील मूळ गावठाणे व गावठाणालगत प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामांचे नियमितीकरण व पुनर्विकासाबाबत समूह विकास योजनेची (क्लस्टर योजनेची) तरतूद नवी मुंबईमधील सिडको नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिसूचीत क्षेत्राच्या सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम ३५ नव्याने अंतर्भूत करण्यासाठी तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत विनियम ४६(६) चा नव्याने अंतर्भाव करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अेअे) अन्वये फेरबदलाची सूचना दि.४/०३/२०१४ रोजी शासनाने प्रसिध्द केली होती. सदर फेरबदल सूचनेच्या अनुषंगाने जनतेने, लोकप्रतिनिधी यांनी हरकती/ सूचना सादर केल्या होत्या. तसेच लोकप्रतिनिधींची त्यानुषंगाने वेळोवेळी निवेदने प्राप्त झाली आहेत. सदरहु फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. अंतिम निर्णय संकल्पित आहे.
(२), (३), (४) व (५) शासनाने माहे डिसेंबर, २०१५ पर्यंतची सर्वच बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला, अशी वस्तुस्थिती नसून, राज्यातील नागरी भागातील दि. ३१/१२/२०१५ पूर्वीच्या बेकायदेशीर बांधकामांना प्रशमित संरचना म्हणुन घोषित करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये सुधारणा करुन कलम ५२(अे) नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच उक्त अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासन अधिसूचना दि. ७/१०/२०१७ द्वारे त्याबाबतचे नियम प्रसिध्द केले आहेत. अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशामित संरचना" म्हणून घोषित करण्याची कायदेशीर तरतूद

करण्यात आली आहे. तथापि, सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालयाने दि.२/११/२०१८ रोजीचे आदेशान्वये काही नियम वापरण्यास मनाई केलेली आहे. मात्र, त्याविरुध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात सिव्हील अपिल दाखल केले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे निकालानुसार शासनाकडून पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींची पत्र प्राप्त झाली आहेत. नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाचे अनुषंगाने धारण केलेल्या क्षेत्राचे सर्व्हेक्षण जिल्हाधिकारी, रायगड यांच्या मदतीने सुरु करणेबाबत नगर विकास विभागाने दि.१६/०३/२०१७ च्या पत्रान्वये सिडको महामंडळास निर्देश देण्यात आले आहेत. तद्नंतर दि. १६/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर सर्व्हेक्षण हे जिल्हाधिकारी, ठाणे व रायगड यांच्यामार्फत करण्यात येणार असल्याने त्यामध्ये सुसुत्रता, संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही सिडकोची निर्धारित करण्यात आली असून नवी मुंबईतील प्रकल्पगस्तांनी गरजेपोटी गावठाण व गावठाणालगत केलेल्या बांधकामाचे सर्व्हेक्षण करण्याचे काम जिल्हाधिकारी, रायगड व ठाणे यांचेस्तरावर सुरु असून सिडकोचा पाठपुरावा सुरु आहे.

-----------------

## नाशिक जिल्हयातील सुमारे ३५ द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची निर्यातदाराने केलेली फसवणूक

**(२८) * १३६१२९ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील बागलाण तालुक्यातील बिजोटे व चांदवड तालुक्यातील वडाळीभोई, कुंडाणे, धोडंबे, मालसाने, शिंदे येथील सुमारे ३५ द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची निर्यातदारांनी एक कोटी नव्वद लाख रुपयांची फसवणूक करुन पळून गेल्याची घटना दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या निर्यातदार आरोपींना पकडून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) याप्रकरणी फिर्यादी व इतर द्राक्ष बागायतदार शेतकरी यांची एकुण रू.७०,११,५०७/- रूपयांची फसवणूक केल्या प्रकरणी वडनेर भैरव पोलीस ठाणे येथे सन २०१९ मध्ये गु.र.नं. ३०/१९ व गु.र.नं. ४२/१९ भा.दं.वि.स. कलम ४२०, ३४ प्रमाणे एकूण २ गुन्हे दाखल आहेत. यापैकी एका गुन्हयात २ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर दोन्ही गुन्हे तपासावर आहेत.

तसेच, फिर्यादी व इतर द्राक्ष बागायतदार शेतकरी यांची एकुण रू.२,२२,२५,७४३/- रूपयांची फसवणूक केल्या प्रकरणी ओझर पोलीस ठाणे येथे सन २०१९ मध्ये गु.र.नं. ५४/१९ व गु.र.नं. ५९/१९ असे एकूण २ गुन्हे दाखल आहेत. सदर दोन्ही गुन्हे तपासावर आहेत.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## डहाणू व तलासरी तालुक्यामधील (जि.पालघर) भूकंपाचे केंद्रबिंदू निश्चित करण्याबाबत

**(२९) * १३५३३६ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर),**

**श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व तलासरी तालुक्यामध्ये (जि.पालघर) दिनांक ४ नोव्हेंबर, २०१८ पासून अद्यापपर्यंत भूकंपाचे धक्के सातत्याने बसत आहेत व भूकंपाचे केंद्रबिंदू निश्चित करण्याकरिता भूकंपप्रवण क्षेत्रात ९ ठिकाणी भूकंपमापन यंत्रे बसविण्यात आली आहेत त्याशिवाय एन.जी.आर.आय. विभागाचे २ शास्त्रज्ञ कार्यरत असूनही भूकंपाचे केंद्रबिंदू नेमक्या कोणत्या ठिकाणी आहे, याचा अद्याप शोध लागलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, भातसा धरण परिसरात सन १९८२ मध्ये भूकंपाचे धक्के जाणवल्यामुळे भातसा धरण क्षेत्रातील खर्डी, लाहे व वाशाळा येथे सन १९८४ मध्ये भूकंपमापन यंत्रे बसविण्यात आली परंतु शासनाच्या दुर्लक्षामुळे भूकंपमापन यंत्रणाची वेळोवेळी देखभाल दुरूस्ती करण्यात आली नसल्यामुळे तीनही यंत्रे कालबाह्य झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातत्याने भूकंप होण्यामागील नेमके काय कारण आहे, भूकंपाचा केंद्रबिंदू नेमका कोणत्या परिसरात आहे, याचा अभ्यास सुरू असला तरी गत ५ महिन्यात प्राथमिक अंदाज देण्यास शासकीय यंत्रणा अपयशी ठरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डहाणू व तलासरी तालुक्यातील गावांमध्ये भूकंपाच्या भितीमुळे नागरिक घराबाहेर निवा-यांमध्ये राहात आहेत, त्यांना रोजंदारीकरिताही जाता येत नसल्याने व त्यातच शासनाने धान्य पुरवठा केला नसल्यामुळे त्यांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, डहाणू व तलासरी तालुक्यात जिवित व वित्तहानी होऊ नये व नागरीकांच्या रोजंदारीचा प्रश्न मार्गी लागून अन्न धान्याचा सुरळीत पुरवठा करण्याबाबत तसेच भातसा धरण परिसरात गुजरातच्या धर्तीवर अत्याधुनिक भुकंपमापक यंत्रे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) नाही.

(३), (४) व (५) दि. ११.११.२०१८ पासून डहाणू तालुक्यातील धुंदलवाडी परिसरात भुकंपाचे धक्के लागत असून, सदरच्या धक्क्यांचा अभ्यास करण्याकरीता डहाणू तालुक्यात ४ ठिकाणी भूकंपमापक यंत्र बसविण्यात आले असून एन.जी.आर.आय. चे शास्त्रज्ञ अभ्यास करण्याकरीता डहाणू तालुक्यात कार्यरत आहेत.

सन १९८३ मध्ये मौ.खर्डी, ता. शहापूर, जि.ठाणे, भातसा-खर्डी परिसरात भूकंपाचे धक्के जाणवू लागले तेव्हा या परिसरातील भूकंप धक्क्यांच्या हालचालींचा अभ्यास करण्यासाठी १० भूकंपमापन केंद्रे कार्यान्वित करण्यात आली. त्यानंतर मात्र भूकंप धक्क्यांचे प्रमाण कमी होऊ लागले तसे भूकंपमापन केंद्रांची संख्या शासनाची मान्यता घेवून मेरी संस्थेने कमी केली. अंतिमत: भातसा, वाशाळा व लाहे ही तीन भूकंपमापन केंद्रे चालू ठेवण्यात आली होती.

भूकंपाच्या धक्क्यामुळे प्रभावित क्षेत्रातील नागरीक घराबाहेर निवारे करुन राहत आहेत. शासनाने प्रभावित क्षेत्रामध्ये धान्य पुरवठा वेळोवेळी केला आहे त्यामुळे उपासमार होत असल्याची बाब खरी नाही.

भातसा धरणावर ५ डिजीटल एक्सोलोग्राफ बसविणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार डिजीटल एक्सोलोग्राफ बसविण्याचे काम नॅशनल जिओफिजिकल रिसर्च इन्स्टीटयुट, हैद्राबाद यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा शहर पाणी पुरवठा योजना भाग-२ अंतर्गत संपूर्ण शहरास शुध्द व सुरळीत पाणी पुरवठा होण्याबाबत

**(३०) * १३५०४४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहर पाणीपुरवठा योजनेच्या भाग-२ मधील सुवर्णनगर, मुद्दे-ले-आऊट, क्रिडा संकुल परिसर, वानखेडे ले आऊट भागात अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याची बाब दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक नागरिकांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुख्याधिकारी, बुलढाणा नगरपरिषद यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्यानूसार बुलढाणा शहर पाणी पुरवठा योजना भाग-२ अंतर्गत संपूर्ण शहरास शुद्ध, सुरळीत व नियमित पाणीपुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

बुलडाणा शहरातील सुवर्ण नगर परिसरात दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी अशुद्ध पाणी पुरवठा होत असल्याची बाब निदर्शनास आली होती.

(२) सदर निवेदन नगरपरिषद बुलडाणा यांना प्राप्त झालेले आहे.

(३) • नगरपरिषदेकडे सदर निवेदन प्राप्त झाल्यावर नगरपरिषदेने त्या परिसरातील पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांची तात्काळ तपासणी केली. त्या तपासणीत एका ठिकाणी गळती होत असल्याचे व त्यामुळे अशुद्ध पाण्याचा पुरवठा झाल्याचे दिसून आले.

• सदर गळती तातडीने दुरुस्त करण्यात आली असून शुद्ध पाण्याचा पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे.

• बुलढाणा शहरासाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत शासनाने रुपये ८२.७७ कोटी इतक्या किंमतीची पाणी पुरवठा योजना मंजूर केली आहे. सदर योजनेची कामे प्रगतीपथावर असून सदर कामे मार्च, २०२० पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

• दरम्यान शहरातील अस्तित्वातील जलशुद्धीकरण केंद्रावरील यांत्रिकी, स्थापत्य कामे तसेच त्यासाठी नवीन उपांगे खरेदी करणे इत्यादी कामे जिल्हास्तर नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नगरपरिषदेने प्रस्तावित केली असून जिल्हा स्तरावर त्यावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भूखंडांच्या भाडेपट्टीधारकांनी अतिरिक्त अधिमूल्याचा भरणा केला नसल्याबाबत

**(३१) * १३८५७३ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या 'जी' ब्लॉक मधील (i) नमन डेव्हलपर्स-भूखंड क्र. जी/सी ५७-५८, (ii) रिलायन्स इंडस्ट्रीज लि. भूखंड क्र. जी/सी ६४, (iii) रिलायन्स इंडस्ट्रीज लि. भूखंड क्र.जी/सी ६६ या भूखंडांच्या भाडेपट्टीधारकांनी बांधकाम निर्धारित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे रुपये २०११ कोटी इतके अतिरिक्त अधिमूल्य आकारून मुदतवाढ देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अधिमूल्याचा भरणा थकबाकी असल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास भूखंड परत घेण्याची नोटीस या वाटपधारकांना देऊनही अद्यापपर्यंत अतिरिक्त अधिमूल्याचा भरणा झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वाटपधारक कंपन्या या देशातील अग्रणी उद्योजक कंपन्या असून श्री.मुकेश अंबानी यांच्या अधिपत्याखालील कंपन्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स, शासकीय अधिपत्याखालील आयकर खाते व विविध बँकांनी अधिमूल्याचा आजपर्यंत भरणा केलेला आहे असे असताना खाजगी उद्योगपतींकडून अधिमूल्याची रक्कम भरली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, रुपये २०११ कोटींच्या अधिमूल्याची वसुली करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, प्राधिकरणाच्या मालकीच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी' ब्लॉक मधील भूखंड क्र.सी-५७-५८ (नमन हॉटेल्स प्रा.लि), भूखंड क्र.सी-६४ व ६६ (रिलायन्स इंडस्ट्रीज लि.) यांनी भूखंडावरील बांधकाम पूर्णत्वाच्या निर्धारित कालावधीत बांधकाम पूर्ण न केल्यामुळे त्यांना भाडेपट्टा विलेखातील तरतूदींनुसार मुदतवाढ देण्यात येऊन अतिरिक्त अधिमुल्याची आकारणी केली आहे व सदरील अतिरिक्त अधिमुल्याचा वाटपग्रहींकडून भरणा करणे बाकी आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे :

| भूखंड क्र. | वाटपग्रही संस्था | दिनांक ३१.०३.२०१९ पर्यत अधिमुल्याची थकबाकी रक्कम रू. (कोटी) |
|---|---|---|
| सी-५७-५८ | नमन हॉटेल्स प्रा.लि | ३४.८२ |
| सी-६४ | रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड | १३८८.१५ |
| सी- ६६ | रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड | ४८९.४३ |
| एकूण रक्कम रू. | | १९१२.४० |

(२) होय, उक्त वाटपग्रहींनी अधिमुल्याची थकीत रक्कम भरणा केली नसल्यामुळे प्राधिकरणाने दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी भूखंड परत घेण्याची नोटीस वाटपग्रहींना (रिझंप्शन नोटीस) दिली आहे. सदर नोटीशीच्या विरोधात वरील वाटपग्रहींनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.३२०९/२०१७ (नमन हॉटेल्स प्रा.लि), याचिका क्र.२४२/२०१८ (सी-६४) व याचिका क्र.५८६/२०१८ (सी-६६) (रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड) दाखल केली आहे.
(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उच्चतम निविदाकार मे. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांना वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंड क्र.सी-६४ व सी-६६ हे भाडेपट्टयावर वाटप केले आहेत. सदर जमीनीचा भाडेपट्टा विलेख

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या वतीने श्री.शालीन टंडन यांनी साक्षांकित केला आहे. तसेच मे. नमन डेव्हलपर्स लिमिटेड यांच्या वतीने श्री. जयेश शाह यांनी भाडेपट्टा विलेख साक्षांकित केला आहे.

(४), (५) व (६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमीन विल्हेवाट) अधिनियम, १९७७ तसेच प्राधिकरणाच्या मान्यतेने वेळोवेळी केलेल्या सुधारणाच्या अनुषंगाने भूखंड वाटपासंबंधी असलेल्या तरतूदींनुसार थकीत अधिमूल्याच्या वसूलीबाबत कार्यवाही करण्यात येते. मे. रिलायन्स इंडस्ट्रिज लि या वाटपग्रहींनी भूखंड क्र.सी-६४ च्या बांधकाम कालावधीत वाढीसाठी थकीत असलेल्या अतिरिक्त अधिमुल्य व व्याजापोटी रक्कम रू.६४६.७७ कोटी (टिडीएस वगळून) इतकी रक्कम दिनांक १८ फेब्रुवारी, २०१९ रोजी प्राधिकरणाकडे भरणा केली आहे. तसेच उर्वरीत रकमेसाठी (रु. १३१२.५४ कोटी) मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाच्या अधिन राहून (याचिका क्र. २४२/२०१८) बँक हमी (बँक गॅरेंटी) प्राधिकरणाकडे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सादर केली आहे. तसेच सी-६६ या भूखंडासाठी रु. ४८९.४३ कोटी एवढे अतिरिक्त अधिमूल्य बांधकाम कालावधीत वाढीसाठी मे. रिलायन्स इंडस्ट्रीज यांचेकडून येणे बाकी आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे अधिमुल्याची वसुली करण्यास विलंब होत आहे.

-----------------

## सांताक्रुझ (पूर्व) वाकोला येथे प्रकल्पबाधितांसाठी असलेली घरे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सुपूर्द न करता परस्पर विकून केलेला गैरव्यवहार

**(३२) * १३५२२४ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल**

**मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईस्थित प्रकल्पबाधितांसाठी असलेली घरे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सुपूर्द न करता ती परस्पर विकून गैरव्यवहार केल्यानंतरही विकासकावर कारवाई करण्याऐवजी त्याला विक्री करावयाच्या इमारतीसाठी प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी परवानगी दिली असल्याची बाब दिनांक १३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांताक्रूझ पूर्व वाकोला येथे इम्पेरिअर कोर्ट या नावे झोपडपट्टी पुनर्वसन योजना सन २०१० मध्ये मंजूर करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ४२ झोपडीधारक असलेली ही योजना मे.एम.आर. बिल्डर्सतर्फे राबविली जात होती सदर योजनेत प्रकल्पबाधीतांसाठी २५ घरे देण्याचे विकासकाने मान्य केले होते परंतु सन २०१३ पर्यंत विकासकाने २५ घरे परस्पर विकली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर घरे प्राधिकरणाला सादर न करणे आणि ती परस्पर इतरांना विकणे हा गुन्हा असतांनाही प्राधिकरणातील संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी घेतला असून संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मौजे कोलेकल्याण, वाकोला, सांताक्रुझ (पूर्व) येथील न.भू.क्र.२७६२अ, २७६२अ/१ ते २०, २७६०, २७६१, २७६८, २७६८/१ ते १७ या भूखंडावर इम्पेरिअर कोर्ट सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या) या संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे आशयपत्र दि.१९.०६.२००९ रोजी व सुधारित आशयपत्र दि.३०.०८.२०१२ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूर केले आहे. तसेच सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे सुधारित मंजूर आराखडे दि. ०२.०४.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आले. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये ३४ पुनर्वसन सदनिका व २१ प्रकल्पबाधितांकरीता (PAP) सदनिका अंत:र्भूत होत्या.

(३), (४) व (५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने केलेल्या स्थळपाहणीमध्ये पुनर्वसन इमारतीमध्ये राखीव ठेवण्यात आलेले प्रकल्पबाधीतांकरीताच्या २१ सदनिकांमध्ये अनधिकृत वास्तव्य असल्याचे आढळून आले. त्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.०२.०५.२०१८ रोजीच्या आदेशान्वये पुनर्वसन घटकाच्या इमारतीतील प्रकल्प बाधित सदनिका (PAP) प्रथम बांधून दिल्यानंतरच विक्री घटकाकरीता पुढील परवानगी देण्यात येईल अशी अट विकासकावर घालण्यात आली आहे.

सदर अटी व शर्ती तसेच सक्षम प्राधिकरणाकडील परिशिष्ट-२ अन्वये विकासकाने सुधारित प्रस्ताव सादर केला.

सुधारित परिशिष्ट-२ नुसार ३ झोपडीधारक पात्र झाल्याने प्रस्तावातील एकूण पुनर्वसन सदनिका ३७ व प्रकल्पबाधित सदनिका संख्या १८ आहेत. सद्य:स्थितीत विंग-अे मधील प्रस्तावित PAP गाळे विक्री घटकात सहसंबधान्वये समाविष्ट करुन प्रस्तावातील १८ PAP, विंग-बी मध्ये बांधून देण्याच्या अटीवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे.

सदर १८ प्रकल्पबाधित गाळे बांधून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास हस्तांतरित झाल्याशिवाय त्या मोबदल्यात विकासकास मिळणारे पुढील विक्री घटकाचे क्षेत्रफळ मंजूर केले जाणार नाही याची काळजी घेण्यात आलेली असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या ई व के (वेस्ट) वॉर्डातील अनधिकृत बांधकामाबाबत

**(३३) * १३८१६२ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका अधिनियमातील नियम ५६ नुसार अनधिकृत बांधकाम झाल्याचे अथवा होत असल्याचे पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिल्यास व त्यावर कारवाई करण्यास पदनिर्देशित अधिकाऱ्याने कसूर केल्यास त्यास तीन महिने कारावास व वीस हजार रुपये दंडाची तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या ई व के (वेस्ट) वार्डातील अनधिकृत बांधकामाबाबत श्री शकील पटणी, लाईफ अँड लाईट एनजीओ यांनी सन २०१६ पासून आतापर्यंत मा.मुख्यमंत्री, आयुक्त, मुंबई महानगरपालिका, उपायुक्त, निष्कासन, प्रधान सचिव, नगरविकास व संबंधित वार्ड ऑफिसर यांच्याकडे पुराव्यासह तक्रार केली असून लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामे पदनिर्देशित अधिकारी व संबंधीत अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही संबंधितांनी केवळ कागदोपत्री कारवाई केल्याचे दाखवून विकासकाच्या संगनमताने कार्यवाहीत त्रुटी ठेऊन कायदा विभागाने कालमर्यादेत कारवाई न केल्याने व इमारत प्रस्ताव विभागाने नियमानुसार तपासणी न केल्याने व पदनिर्देशित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून महानगरपालिका व शासनाने कारवाई न केल्याने दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अनधिकृत बांधकामास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ई व के/पश्चिम वॉर्डातील अनधिकृत बांधकामाबाबत लाईफ ॲण्ड लाईट एन.जी.ओ. यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत हे खरे आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलमान्वये व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येते.

अनधिकृत बांधकाम तसेच त्याविरुध्द कारवाई न करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे संपूर्ण अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागास प्राप्त २७७ तक्रारींपैकी महानगरपालिकेच्या अखत्यारीतील १४७ तक्रारींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालात नमूद करण्यात आले आहे:-

• २५ तक्रारींमध्ये नमूद केलेल्या अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

• १४ प्रकरणे मा. उच्च न्यायालय व मा. दिवाणी न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत.

• ३० तक्रारींमध्ये नमूद केलेल्या तात्पुरत्या शेड बांधकामधारकांनी स्वत:हून काढून घेतल्या आहेत.

• ६ तक्रारींमध्ये नमूद केलेल्या अनधिकृत बांधकामांवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना कायदा कलम ५३(१) मधील तरतुदींनुसार कारवाई सुरु आहे.

• ६४ तक्रारींमध्ये नमूद केलेल्या बांधकामांची स्थळपाहणी केली असता, बांधकाम सुरु असल्याचे आढळून आले नाही.

• ६ तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.

• २ तक्रारींमध्ये तक्रारस्थळाचा अचूक उल्लेख नसल्याने तक्रारीची शहानिशा होऊ शकली नाही.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “ई” विभागास प्राप्त २० अनधिकृत बांधकामांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• ३ अनधिकृत बांधकामांपैकी २ बांधकामांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३५४ए व १ बांधकामावर एमआरटीपी ५३(१) अन्वये निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

• ३ अनधिकृत बांधकामांना एमआरटीपी ५३(१) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

• ७ इमारतींतील बांधकामे नियमानुसार सुरु असल्याचे आढळून आले.

• २ अनधिकृत बांधकामांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ३५४(ए) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या असून, सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

• ३ बांधकामे मुंबई बंदर विश्वस्त यांच्या अखत्यारीतील आहेत.

• २ तक्रारींमध्ये तक्रारस्थळाचा अचूक उल्लेख नसल्याने तक्रारीची शहानिशा होऊ शकली नाही.

-----------------

**राज्यातील महिला व अल्पवयीन मुलींच्या अपहरणात वाढ झाल्याबाबत**

**(३४) * १३९७७९ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या ट्रॅक द मिसिंग चाईल्ड या जालनिशी (वेबसाईट) नुसार महाराष्ट्रातून १९ हजार ९२० मुले आजही बेपत्ता असून दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यादरम्यानच्या आकडेवारीनुसार २४ तासात या जालनिशी वर गत महिनाभरात ७३ मुले बेपत्ता झाल्याची नोंद असून, गतवर्षभरात १६६४ मुले बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईमध्ये अल्पवयीन मुलींच्या अपहरणांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून माहे जानेवारी ते मार्च २०१९ या कालावधीत ३४७ अल्पवयीन मुलींचे अपहरण करण्यात आले, त्यापैकी फक्त २०५ जणींचा शोध घेण्यात पोलीसांना यश आल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, तसेच ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरामध्ये ४ महिन्यात अपहरणाच्या ५१ घटना घडलेल्या असून सदर प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याची बाब दिनांक १४ मे २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात सन २०१६ मध्ये २३ मुले, सन २०१७ मध्ये २५ मुले, सन २०१८ मध्ये ६९ मुले बेपत्ता झाली असल्याची बाब माहे एप्रिल २०१९ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्रात सन २०१५ मध्ये मानवी तस्करी प्रकरणी ६९२ तर सन २०१७ मध्ये ५१७ गुन्हे नोंदविण्यात आले, या दोन वर्षातील बेपत्ता मुले आणि महिलांची आकडेवारी महाराष्ट्राच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याचे सदर अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महाराष्ट्रात सन २०१५ मध्ये ४ हजार ४५० मुले बेपत्ता झाली होती, त्यापैकी २ हजार ५४३ मुली आहेत त्याचप्रमाणे सन २०१६ मध्ये ४ हजार ३८८ मुलांपैकी २ हजार ५३२ मुली आहेत, या दोन वर्षात महाराष्ट्रातून अनुक्रमे २३ हजार ४४३ आणि २५ हजार ७८४ महिलाही बेपत्ता झाल्याचे सदर अहवालातील आकडेवारी मध्ये नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याबाबत काय कार्यवाही केली आहे तसेच याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र सरकारच्या ट्रॅक द मिसिंग चाईल्ड या संकेत स्थळाच्या तपशिला नुसार दिनांक १४ जुन, २०१९ पर्यंत महाराष्ट्रात एकूण बेपत्ता मुले व मिळून आलेल्या मुलांचा तपशिल खालील प्रमाणे

| | एकूण | गत महिन्याभरात | गेल्या २४ तासामधील |
|---|---|---|---|
| हरविलेले | २०२३३ | ८९ | ४ |
| मिळून आलेले | २३३९१ | ८० | १ |

(२) १८ वर्षाखालील हरविलेल्या लहान मुलांच्या बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.७५/२०१२, बचपन बचाव आंदोलन या संबंधाने दिनांक १०.५.२०१३ रोजीच्या आदेशानुसार १८ वर्षाखालील हरविलेल्या मुलांबाबत अपहरणाचा गुन्हा (FIR) दाखल करण्यात येतो. मुंबई मध्ये जानेवारी ते एप्रिल २०१९ या कालावधीत ५१६ मुलींचे अपहरण या सदराखाली गुन्हे दाखल असून त्यापैकी ३५८ मुलींचा शोध घेण्यात आला. भिवंडी शहरात अपहरण या सदराखाली दाखल गुन्ह्यातील ५१ बालकांपैकी ४५ बालके मिळून आले आहेत.

(३) रत्नागिरी जिल्ह्यात सन २०१६ मध्ये एकूण ५२ मुले/मुली बेपत्ता झाल्याची नोंद असून ती सर्व मिळून आली आहेत. सन २०१७ मध्ये हरविलेली सर्व ६४ मुले/मुली मिळून आली. सन २०१८ मध्ये ६८ बेपत्ता मुलांपैकी ६७ मिळून आली आहेत.

(४) महाराष्ट्रात भा.द.वि. कलम ३७० व भा.द.वि. ३७०(अ) प्रमाणे सन २०१५ मध्ये अनैतिक मानवी तस्करी प्रकरणी ६९२ तर सन २०१७ मध्ये १३८ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तथापि, महिला व बालके हरविले प्रकरणी अनैतिक मानवी वाहतुकीच्या गुन्ह्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

(५) महाराष्ट्रात सन २०१५ व २०१६ मध्ये बेपत्ता मुले, मुली व महिला यांची माहिती खालील प्रमाणे.

| वर्ष | बेपत्ता मुले | सापडलेली मुले | बेपत्ता मुली | सापडलेली मुली | बेपत्ता महिला | सापडलेल्या महिला |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ | २८२३ | २६४२ | ५३१० | ५१०८ | २४५९६ | २१७६२ |
| २०१६ | ३०१२ | २८७९ | ६२०९ | ५९४७ | २६३२५ | २२३८३ |

(६) अनैतिक मानवी वाहतुक/तस्करी रोखणेकरीता महाराष्ट्र राज्यामध्ये १२ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. तसेच

लहान मुले हरविलेबाबत तपास अनुषंगाने अनुसरायाची मानक कार्यप्रणाली (SOP) सर्व घटकांना वितरीत करण्यात आलेली आहे.

हरविलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान हि शोध मोहिम सन २०१५ ते सन २०१८ या कालावधीत एकूण ०६ वेळा राबविण्यात आली व सदर मोहिमेत एकूण २३७९५ बालकांचा शोध घेण्यात आला.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील होमगार्डच्या मानधनात वाढ करण्याच्या निर्णयाबाबत

**(३५) * १३६५१० श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५० हजारांहून अधिक होमगार्डच्या मानधनवाढीच्या निर्णयाची अद्यापही अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होमगार्ड महासमादेशक कार्यालयाने गत वर्षी दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास होमगार्डच्या मानधनासह विविध मागण्यांबाबत गृह विभागाला प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीच्या दिनांक १ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत होमगार्डचे मानधनवाढी बरोबरच इतरही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उप समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजीपासून करणे आवश्यक असताना समादेशक अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नसल्याने होऊ शकत नसल्याचे महासमादेशकाने शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर उपसमितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासन स्तरावरील काही मुद्दयांबाबत काही निर्णय घेण्यात आले असून, उर्वरित मुद्दयांबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही चालु आहे. समादेशकांशी संबधित मुद्दयांवर त्यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) महासमादेशकांकडुन यासंदर्भात अहवाल मागविण्यात आलेला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) परिसरातील केमिकल कंपन्यांचे सांडपाणी असणारी विहिर स्वच्छ करताना झालेल्या दुर्घटनेत ५ व्यक्तींचा झालेला मृत्यु

**(३६) * १३८२३० डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-चक्कीनाका परिसरातील सोलार केमिकल कंपनी, सनराईस आणि वेलकम या केमिकल कंपन्यांचे सांडपाणी सोडण्यात येत असलेल्या विहीरीची साफ-सफाई करण्यासाठी उतरलेल्या तीन कामगार आणि त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करणारे दोन अग्निशमन जवान यांचा माहे डिसेंबर,

२०१८ मध्ये वा त्या दरम्यान मृत्यू झाल्याच्या घटनेची चौकशी करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, चौकशी अहवालातील निष्कर्ष काय आहेत व या घटनेस जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१.११.२०१८ रोजी चक्कीनाका येथील महादेव मंदिराशेजारी असलेल्या खाजगी विहिरीच्या पाण्यात विद्युत प्रवाह उतरल्याने ३ इसम गुदमरत असल्याचा दुरध्वनी संदेश महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास प्राप्त झाला.

• अग्निशमन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचल्यानंतर विद्युत प्रवाह बंद करून विहीरीतील ३ इसमांना वाचविण्यासाठी २ फायरमन विहीरीत उतरले.

• विहीरीतील ३ इसमांना बाहेर काढतांना अग्निशमन विभागाचे २ फायरमनही पाण्यात कोसळले. विहिरीतील विषारी वायूमुळे अग्निशमन दलाचे २ जवान व अपघातग्रस्त ३ इसम अशा एकूण ५ व्यक्तींचा दुर्घटनेत मृत्यु झालेला आहे.

• सदर प्रकरणाची उप विभागीय दंडाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत त्रयस्तपणे चौकशी करण्याची आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी दि. २.११.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना विनंती केली.

• प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी त्यांच्या दि. १५.११.२०१८ च्या पत्रान्वये उप विभागीय दंडाधिकारी, कल्याण यांना झालेल्या घटनेची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे कळविले आहे.

• त्याअनुषंगाने उप विभागीय दंडाधिकारी यांनी दि.२०.११.२०१८ च्या पत्रान्वये १) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ, कल्याण, ३) उप आयुक्त, पोलीस परिमंडळ, कल्याण, ४) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व ५) तहसिलदार, कल्याण यांचेकडून अहवाल मागविलेला आहे.

• महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांकडून अहवाल संकलीत करून उप विभागीय अधिकारी, कल्याण यांना सादर करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कर्णबधिर तरुण-तरुणींच्या मोर्चावर पोलीसांनी केलेला लाठीमार

**(३७) * १३६३७७ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कर्णबधिर तरुण-तरुणींनी आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चा काढला असता सदर मोर्चावर पुणे येथील समाजकल्याण कार्यालयासमोर दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास पोलीसांनी केलेल्या लाठीमारात अनेक कर्णबधिर गंभीर जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कर्णबधिर तरुण-तरुणींच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या मागण्यांवर शासनाने निर्णय घेतला आहे काय व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, लाठीमारात जखमी झालेल्या कर्णबधिरांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) सदर मोर्चामध्ये राज्यातील कर्णबधीर तरुण तरुणी यांच्या आंदोनाच्या वेळी कोणतीही जिवीत किंवा मालमत्तेची हानी झालेली नाही. आंदोलनकर्ते

यांचे जिवीताचे रक्षण व्हावे, चेंगराचेंगरी होवून दुर्घटना घडू नये याकरिता पोलीसांनी संवेदनशीलतेने त्यांचे रक्षण केलेले आहे. कर्णबधिर तरुण-तरुणीच्या मागण्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे :-

१) प्रत्येक महसूल विभागाच्या ठिकाणी दिव्यांगासाठी शासकीय कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे

२) उच्च शिक्षण घेण्याच्या दृष्टीने कर्णबधीर विद्यार्थ्यांकरिता सांकेतिक भाषा तज्ञांची नियुक्ती करणे

३) कर्णबधीर विद्यार्थ्यांसाठी आयटीआयच्या धर्तीवर महाविद्यालय सुरु करणे.

४) सांकेतिक भाषेचा डिग्री कोर्स सुरु करणे.

५) कर्णबधीर दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र देण्यास प्रतिबंद करणे.

६) मुकबधीर शिक्षकाची नियुक्ती मोबाईल शिक्षक म्हणून नियुक्ती करणे.

७) कर्णबधीर व्यक्तींना बेरोजगार भत्ता देणे.

८) शासकीय नोकरीमध्ये उच्च शिक्षण व लेखी परिक्षेची अट लावू नये.

९) वाहन चालविण्याचा परवाना देण्यात यावा.

१०) शासकीय नोकरी देण्यात यावी.

११) सरकारी जागेवर व्यवसाय करण्याची जागा उपलब्ध करुन द्यावी.

१२) कर्णबधीर विशेष शाळेतील शिक्षकांचे सेवाभरती नियम तयार करणे

(३) सदर मागण्यांच्या अनुषंगाने निर्णय घेण्याकरिता सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १०.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकरणी आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील, सिडकोचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी पद मिळविण्यासाठी अनुसूचित-जाती जमातीचे बनावट प्रमाणपत्र सादर केल्याबाबत

**(३८) * १३५६७२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील, सिडकोचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी पद मिळविण्यासाठी, डॉ.निनावे यांनी अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र सादर केले आहे तसेच त्यांचे प्रमाणेच सिडकोच्या प्रशासन, लेखा, कार्मिक, अभियंता, नियोजन, अतिक्रमण आदी विभागात जातीचे बनावट प्रमाणपत्र सादर करुन नोकरी मिळविल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत, त्यानूसार बनावट प्रमाणपत्र सादर करुन शासकीय नोकरी व सवलतींचा लाभ घेणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांना शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्वरीत सेवेतून निलंबित करुन शासनाच्या नुकसानीची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दि.१५.१.१९९६ रोजी श्री.निनावे यांची "हलबा" या अनुसूचीत जमाती प्रवर्गातून सहाय्यक जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, जात पडताळणी समिती, नागपूर यांनी श्री.निनावे यांचा 'हलबा' या अनुसूचित जमातीचा दावा दि.१५.२.२०१८ रोजीच्या आदेशानुसार अवैध ठरवला होता. समितीच्या सदर आदेशाच्या विरुध्द वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी यांनी मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयासमोर अपिल दाखल केले होते. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर अपिल फेटाळल्याने श्री.निनावे,वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको यांच्या सेवा दि.७.९.२०१८ रोजीच्या आदेशान्वये सिडको महामंडळाने संपुष्टात आणल्या आहेत.

तसेच श्री.निनावे यांना सिडको महामंडळामार्फत देण्यात आलेले दिलेल्या आर्थिक लाभाची रक्कम वसूल करण्याची बाब महामंडळाच्या स्तरावर विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेच्या ठेकेदारांनी केलेला अपहार

**(३९) * १३५७९६ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या २५ ठेकेदारांवर ठेका कर्मचाऱ्यांची आर्थिक पिळवणूक तसेच कर चोरी करुन सुमारे १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दिनांक ४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेस माहे जुलै, २००९ पासून ते फेब्रुवारी, २०१८ पर्यंत ठेका पध्दतीने कर्मचारी पुरविण्याचे काम

ठेकेदाराने केले असून ३१६५ पेक्षा अधिक कर्मचारी ठेका पध्दतीने ठेकेदारांकडून पुरविले असून त्यामध्ये वकील, अभियंते, डॉक्टर, आरोग्य व अग्निशमक कर्मचारी, संगणक चालक, लिपिक, मजूर, सुरक्षा रक्षक, वाहनचालक इत्यादी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदाराने शासनाचा सेवाकर व व्यवसाय कराचे सुमारे रुपये २९.५१ कोटी व कर्मचारी वेतन रुपये ९२.२७ कोटी असे एकूण १२२.४८ कोटी रुपयांचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देयकासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे तसेच वैधानिक तरतूदीची पूर्तता नसताना, दरमहा लाखो रुपयांची देयके मंजूर करुन ठेकेदाराला रक्कम अदा करण्यात महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ठेका कर्मचाऱ्यांना किमान वेतन, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी तसेच एसआयसीच्या लाभापासून वंचित ठेऊन वेठबिगार पध्दतीने ठेकेदाराने राबवून घेतल्याची बाब माहितीच्या अधिकारात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित ठेकेदार व महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१), (२), (३), (४), (५) व (६) • वसई-विरार शहर महानगरपालिकेने कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचा ठेका सन २०१२ ते २०१७-१८ या कालावधीत दिला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

• श्री.मनोज पाटील यांनी केलेल्या वैयक्तीक तक्रारीवरुन वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधित ठेकेदारांविरुध्द विरार पोलीस ठाणे येथे पो.स्टे.गु.रजि. १८८/२०१९ भादंविस कलम ४२०, ४०६, ४०८, ४०९, ३४ दिनांक ०२.०३.२०१९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरण आर्थिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडे पुढील तपास करणेकरीता वर्ग करण्यात आले आहे.

• विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना याप्रकरणी चौकशी करून तीन महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
• सदर प्रकरणी विभागीय आयुक्तांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई करणे प्रस्तावित आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथे म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासात १०० कोटींचा झालेला टीडीआर गैरव्यवहार

**(४०) * १३८३६९ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा अभिन्यासातील पुनर्विकासासाठी म्हाडाच्या जमिनीवरील प्रस्तावाला कोणताही टीडीआर देण्यात येत नाही व त्यानूसार म्हाडाच्या इमारतींना वाढीव टीडीआर देता येत नसल्याचे शासनाने ठाणे महानगरपालिकेला लेखी कळविले असताना देखील ठाण्यात म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासात १०० कोटींचा टीडीआर गैरव्यवहार झाला असल्याची बाब दिनांक २३ फेब्रुवारी, २१०९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मौजे पाचपाखाडी, माजिवडे, सेक्टर क्र.४, वर्तकनगर, ठाणे येथील म्हाडाच्या अभिन्यासातील इमारतींना २.५० च.क्षे.नि.अनुज्ञेय करुन दि.३०.१०.२००९ रोजी सुधारित अभिन्यासास मंजूरी दिली आहे.

ठाणे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार शहरातील जुन्या इमारतींना पुनर्विकासाकरीता १५% उत्तेजनार्थ बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय करण्याची तरतूद आहे. सदरहू तरतूदीनुसार उपरोक्त नमूद म्हाडाच्या इमारतींना २.५० च.क्षे.नि. तसेच त्यावर अस्तित्वातील बांधकाम क्षेत्राच्या १५% उत्तेजनार्थ बांधकाम क्षेत्रफळ वितरित केले आहे.

परंतु, अशाप्रकारे एकाच प्रकरणात दोन स्वतंत्र नियमांचा अतिरिक्त फायदा देणे अभिप्रेत नसल्याने उक्त १५% उत्तेजनार्थ बांधकाम क्षेत्र वितरित करता येत नाही, असे नगर विकास विभागाने त्यांच्या दि.१२.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केले आहे. त्यामुळे सदर १५% उत्तेजनार्थ बांधकाम क्षेत्र वितरित करण्याचे थांबविण्यात आले आहे. त्यानुसार अनुज्ञेय नसलेले ६४८३.३७ चौ.मी. क्षेत्र भुनिर्देशांकामधून वजा करुन सुधारित अभिन्यास ठाणे महानगरपालिकेकडे सादर करण्याची कार्यवाही म्हाडामार्फत करण्यात येत आहे. तसेच यापूर्वी वितरित केलेले क्षेत्र रद्द करण्याबाबत संबंधितांना कळविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचेही म्हाडाने कळविले आहे.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेत झालेला टीडीआर गैरव्यवहाराच्या चौकशीचे दिलेले आदेश

**(४१) * १३४९९३ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिका अंतर्गत देवळाली शिवारातील भूसंपादन करताना शासकीय बाजार मूल्य तक्त्यात फेरफार करून महानगरपालिकेची फसवणूक करून कोट्यवधी रुपयांचा टीडीआर नगररचना विभागाने वाढविल्याची बाब माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेच्या महासभेने नाशिक महानगरपालिकेत झालेल्या टीडीआर गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक महानगरपालिकेची आर्थिक फसवणूक झालेली असताना व महासभेने चौकशीचे आदेश दिलेले असताना संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, लवकरात लवकर सदर चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१), (२) व (३) • नाशिक महानगरपालिका हद्दीअंतर्गतच्या मौजे देवळाली शिवारातील सर्व्हे नंबर २९५ मधील जागेच्या हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर करतांना खुल्या जमीनीचा प्रति चौ.मी. दर रु.६८३० ऐवजी रु.२५१०० इतका वाढवून दिल्याची तक्रार नाशिक महानगरपालिकेस दि.२७/६/२०१७ रोजी प्राप्त झाली होती.

• सदर जमीनीचा मूल्यदर प्रति चौ.मी. हा रु.२१५००/- इतका असल्याचे स्पष्ट करुन तक्रारीत तथ्य नसल्याचे सहायक संचालक नगररचना, मुल्यांकन, नाशिक यांनी कळविले आहे.

• तसेच, यासंदर्भात नाशिक महानगरपालिका महासभेने चौकशीचे कोणतेही आदेश दिलेले नाहीत.

(४) यासंदर्भात प्राप्त झालेली तक्रार व वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेले वृत्त विचारात घेऊन, सह संचालक नगररचना, नाशिक यांना दि.२४/०५/२०१९ अन्वये चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत सूचित केले असल्याचे आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या जोगेश्वरी (प) येथील ओशिवरा उद्यानाच्या जागेवर झालेले अतिक्रमण

**(४२) * १३८२५६ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या जोगेश्वरी (प) येथील ओशिवरा उद्यानाच्या सुशोभीकरणासाठी कोटयवधी रुपये खर्च केलेले असतांना सदर उद्यानाच्या जागेवर श्री.अब्दुल बलकिया, आशीफ व इरफान यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने अतिक्रमण केल्याबाबतची तक्रार मुंबई महानगरपालिकेच्या तक्रार दुरुध्वनी क्रमांकावर सन २०१६ पासून वारंवार करुनही त्याची दखल न घेतल्याने यासंदर्भातील तक्रार श्री.शकील पटणी यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली तसेच अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) न.भू.क्र. ४८६ हा भूखंड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांच्या परिक्षेत्रात असून, के/पश्चिम विभागातील सदर भूखंडावर मौलाना अब्दुल कलाम आझाद उद्यान महानगरपालिकेमार्फत विकसित करण्यात आले आहे. सदर भूखंडावर कोणतेही अतिक्रमण नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, सदर उद्यानाच्या पूर्वेकडे लागून असणारी मौजे ओशिवरा न.भू.क्र. ५०६ २/१, ५०६ २/२ व इतर जमीन एमएमआरडीएने संपादित केली असून, सदर जमीन एमएमआरडीएने श्री. अब्दुल रहीम व्हि. बिलकीया यांना भाडेतत्वावर दिली आहे.

सदर जमिनीची नगर भूमापन कार्यालय, अंधेरी यांचेकडून संयुक्त मोजणी करण्यात आली असून, त्यानुसार सीमांकन करण्यात आले असल्याचे एमएमआरडीएने बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविले आहे. सदर सीमांकनानंतर उद्यानाचे क्षेत्रफळ बदललेले नाही.

सदर भूखंड व उद्यान यांचे दरम्यान संरक्षक भिंत बांधण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात येत होते. तथापि स्थानिक नागरिकांनी त्यास विरोध दर्शविल्यामुळे सद्य:स्थितीत भिंत बांधण्याचे काम बंद असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## पुणे शहरातील बी.डी.पी. आरक्षण असलेल्या टेकडयांवर अनधिकृत बांधकाम करण्यात येत असल्याबाबत

**(४३) * १३७८०० प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील बी.डी.पी. आरक्षण असलेल्या १.म्हातोबा टेकडी, २. डुक्कर खिंड महात्मा, ३. चांदणी चौक या भागातील टेकड्यांवर अनधिकृत बांधकाम करण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारजे, बाणेर, पाषाण व कात्रज परिसरात असणाऱ्या छोट्या मोठ्या टेकड्या फोडून भूभागाला समांतर केल्याचे व मागील अनेक वर्षा पूर्वी पासूनचे असणारे जलस्त्रोत बुजविण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत आयुक्त, पुणे यांना सदर बांधकामांवर कारवाई करण्यासंदर्भात पत्रव्यवहार केला असून याबाबत कोणतीच कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बांधकाम काढून टाकणेबाबत कोणती कार्यवाही केली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बी.डी.पी. आरक्षणामधील चांदणी चौक परिसर, म्हातोबा टेकडीसह वारजे, कात्रज या ठिकाणी काही प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत आहेत, तसेच महात्मा सोसायटी लगतच्या डुक्करखिंडी

टेकडीवर काही भागात अनधिकृत प्लॉटिंग सुरू करण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) वारजे, बाणेर, पाषाण, कात्रज परिसरात टेकड्या फोडून भू-भागाला समांतर केल्याचे व जलस्त्रोत बुजविण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, सदर ठिकाणी अनधिकृत बांधकामांसाठी खड्डे पाडण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) पौंड रोड ते चांदणी चौकाकडून कोथरूड डेपोकडे जाणाऱ्या रस्त्यावर डावीकडे राजरोजसपणे टेकडी फोडून बांधकाम चालू असल्याबाबत तसेच डुक्करखिंडी येथील टेकडीवर अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्यांनी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना पत्र दिलेले आहे, हे खरे आहे.

(४) बी.डी.पी. आरक्षणामध्ये सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामावर एमआरटीपी अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार विहित नोटीस देऊन सदर बांधकाम पाडण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

• चांदणी चौकालगतच्या बी.डी.पी. आरक्षित जागेवरील अनधिकृत बांधकाम कारवाई करून पाडण्यात आले आहे.

• वारजे व कोथरूड भागात बीडीपी क्षेत्रात अनधिकृत प्लॉटींग करीत असलेल्या व्यक्ती विरोधात एमआरटीपी अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार पोलीसांकडे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

• महात्मा सोसायटी लगतच्या डुक्करखिंडी टेकडीवर काही भागात सुरू असलेल्या अनधिकृत प्लॉटिंगबाबत संबंधीतांविरूध्द पोलीसांकडे गुन्हा दाखल करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे.

• बी.डी.पी. आरक्षणावरील बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत बांधकामांवर वेळोवेळी नोटीस देऊन पाडण्याची दक्षता घेण्यात येते असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल शहरातील कासुंदे येथील भुयारी गटारात उतरुन मलवाहीनीची सफाई करताना ३ व्यक्तींचा झालेला मृत्यु

**(४४) * १३८१७८ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल शहरातील कासुंदे येथील भुयारी गटारात उतरुन मलवाहीनीची सफाई करताना २ कामगार आणि ठेकेदाराचा गुदमरुन मृत्यु झाल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत व्यक्तिींच्या कुटुंबियांना कोणत्या प्रकारची आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर घटनेची चौकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या उच्च स्तरीय समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार ठेकेदारांनी सिडकोच्या संबंधीत अधिकाऱ्यांना न कळविता परस्पर मल:निस्सारण वाहिनीचे साफसफाईचे काम सुरु केले होते.

प्रस्तुत घटनेमध्ये मृत झालेल्या २ कामगारांच्या कुटुंबियांना प्रत्येकी रु.१० लक्ष आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. सदरची रक्कम मृत व्यक्तींच्या कायदेशीर वारसांना अदा करण्यासाठी रु.८,३१,९२०/- व रु.७,३३,६८०/- चे धनादेश कामगार न्यायालय, ठाणे यांच्याकडे दि.०७.०२.२०१९ रोजी जमा करण्यात आले असून उर्वरित रक्कम मा.कामगार न्यायालय, ठाणे यांच्याकडे सिडको महामंडळामार्फत जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईला पश्चिम उपनगरांशी जोडणाऱ्या नियोजित कोस्टल रोड प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या कोळी बांधवांच्या पुनर्वसनाबाबत

**(४५) * १३७९६४ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईला पश्चिम उपनगरांशी जोडणाऱ्या नियोजित कोस्टल रोड प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या कोळी बांधवांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या नसून प्रकल्पबाधितांबाबत शासनाच्या उदासिनतेविषयी मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास नाराजी व्यक्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोस्टल रोडमुळे बाधित होणाऱ्या लोकांच्या पुनर्वसनासाठी शासनाने कोणती प्रभावी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कोस्टल रोड प्रकल्पादरम्यान कोळी समाजाच्या वस्त्या व मासे सुकविण्याच्या जागा बाधित होत नाहीत. तथापि, स्थानिक मच्छिमारांनी त्यांच्या उदर निर्वाहावर परिणाम होत असल्याचा आरोप करीत मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. त्यापैकी याचिका (लॉ) क्र. ५६०/२०१९ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१९ रोजी आदेश पारित केले. तथापि, सदर आदेशामध्ये नाराजी व्यक्त केली अशी बाब नाही. तथापि, कोस्टल रोड संबंधात मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका (लॉ) क्र. ४४/२०१९ सह याचिका (लॉ) क्र. ३६/२०१९ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.१६/०४/२०१९ रोजी भराव करणेच्या कामाचे अनुषंगाने जैसे थे

(Status quo) चे आदेश दिले होते. सदर आदेशा विरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल (SLP) (C)क्र १०९१६/२०१९ दाखल केले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.६/०५/२०१९ रोजीच्या आदेशाद्वारे मा.उच्च न्यायालयाचे आदेशाद्वारे लागू झालेली स्थगिती मागे घेतली आहे.

(२) व (३) कोस्टल रोड प्रकल्पात कोळी बांधवांच्या वस्त्या तथा मासे सुकवण्याच्या जागा बांधीत होत नसून पुनर्वसनाचे प्रश्न उद्भवत नाही. तथापि, संभाव्य बाधित होणाऱ्या कोळीबांधवांच्या नुकसान भरपाईसंबंधी मा.उच्च न्यायालयात महानगरपालिकेने दाखल केलेल्या कृती आराखडयानुसार किनारी रस्ता प्रकल्पामुळे मासेमारी आणि मच्छीमारांच्या उदरनिर्वाहांच्या साधनांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR)-कैंद्रिय सागरी मत्स्यव्यवसाय संशोधन संस्था (CMFRI) त्यांच्यामार्फत सुरु करण्यात आला असून सदर संस्थेच्या अहवालामध्ये, जर कोळी बांधवांच्या उपजिविकेच्या साधनावर परिणाम होत आहे असे आढळून आल्यास, सदर कोळीबांधवांना योग्य ती नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

-----------------

## माहूल (मुंबई) येथील रहिवाश्यांचे अन्यत्र स्थलांतर करण्याबाबत

**(४६) * १३५०८२ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन**

**मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील तानसा पाईपलाईन परिसरातील सुमारे ५००० कुटूंबाचे पुनर्वसन माहूल (मुंबई) येथे करण्यात आले होते तथापि माहूल गावातील परिसर राहण्यासाठी अत्यंत अयोग्य असल्याने याबाबत शासनाने चौकशी करण्याकरिता आयआयटी, पवई, मुंबई यांचेकडे हे प्रकरण सोपविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा अंतिम अहवाल आयआयटीने दिनांक ४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात तेथील रहिवाश्यांना शारिरीक आजारांनी ग्रासले असून त्यामध्ये २०४ लोकांना त्वचा रोग, १२९ जणांना थंडी ताप, खोकला, २०० जणांच्या वजनामध्ये घट तसेच १४६ जणांच्या नोकऱ्या गेल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या परिसरात कारखाने तसेच रिफायनरी असल्याने मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होत असून पर्यावरणाची हानी होत असल्याने या परिसरातील नागरिकांचे स्थलांतर करण्याचा सल्लाही देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, माहूल वासियांनी त्यांचे पुनर्वसन अन्य ठिकाणी करावे यासाठी मुंबईतील आझाद मैदानावर दिनांक १५ डिसेंबर, २०१८ रोजीपासून ठिय्या आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार तेथील नागरिकांचे अन्यत्र स्थलांतर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकांमध्ये, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार माहुल परिसरातील शाळा, आरोग्य, पायाभुत सुविधा आणि दळणवळणांच्या सोयी-सुविधांबाबत सर्वेक्षण करण्याकरिता आय.आय.टी., मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली होती.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी आय.आय.टी., मुंबई यांचा प्रारुप अंतिम अहवाल सादर केला असून सदर अहवाल अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली असून मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २ व ३ एप्रिल, २०१९ रोजीच्या आदेशास मा. सर्वोच्च न्यायालयाने स्थागिती दिली आहे.

(५) माहूल वासियांनी त्यांचे पुनर्वसन अन्य ठिकाणी करावे यासाठी मुंबईतील आझाद मैदानावर दिनांक १५ डिसेंबर, २०१८ रोजीपासून ठिय्या आंदोलन सुरु केले होते ही वस्तुस्थिती आहे.

(६) व (७) तानसा पाईपलाईन प्रकल्पबाधितांना माहुल येथील प्रकल्पाव्यतिरिक्त मुंबईत इतरत्र घर/पीएपी उपलब्ध करुन देण्याच्या शक्यतेच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१.१२.२०१८ रोजी समिती स्थापन करण्यात आली आहे.

-----------------

## पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या धायरी, शिवणे, उत्तमनगर गावांमध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई

**(४७) * १३५४३५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या धायरी, शिवणे, उत्तमनगर गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई उद्‌भवली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व गावांमध्ये एकूण ८० टक्क्यांपेक्षा अधिक नागरिकरण झालेले आहे तसेच २० ते २५ टक्क्यांपर्यंत शेती क्षेत्र असून याशिवाय ७५ टक्क्यांपेक्षा अधिक बांधकामे झालेली असल्याने या गावांतील रहिवाशांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे व टँकरद्वारे पाणी विकत घेण्याची वेळ आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या गावांमध्ये पाणी टंचाईची समस्या असतांना संबंधित प्रशासनाच्या वतीने कुठलीही कार्यवाही होत नसल्याने नागरिक, लोकप्रतिनिधी यांनी मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना लेखी निवेदन दिले असून अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशील काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना पाणी टंचाई असल्याबाबत दै.सकाळ या वृत्तपत्रामध्ये मे, २०१९ मध्ये या संदर्भात बातमी आली होती, हे खरे आहे. तसेच धायरी, शिवणे व उत्तमनगर या तीनही गावांतील पाणीटंचाईवरील उपाययोजनांबाबत स्थानिक विधानसभा सदस्यांनी दि.१८.०६.२०१८ रोजी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना निवेदन दिले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) • धायरी परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून १ दिवस आड पाणीपुरवठा केला जातो, ही वस्तुस्थिती आहे.

• धायरी फाटा येथे पुणे महानगरपालिकेमार्फत नव्याने टँकर पॉईंट विकसित करण्यात येत असून धायरी भागात पुणे महानगरपालिकेमार्फत प्रतिदिन १४ ते १५ टँकर पुरवले जातात हे खरे आहे.

• सदर भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात अस्तित्वातील पाईपलाईन अपुऱ्या पडत असल्याने या ठिकाणी मोठया व्यासाच्या जलवाहिनी टाकण्याचे काम टप्प्याटप्प्याने करण्याचे नियोजन आहे. याकरीता निविदा प्रक्रिया सुरु आहे.

• ग्रामपंचायतीकडून हस्तांतरीत करण्यात आलेल्या टाक्या (ESR) कार्यान्वित करण्याचे काम पुणे महानगरपालिकेमार्फत चालू आहे.

• शिवणे व उत्तमनगर या गावांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा केला जातो. तथापि, या गावांची लोकसंख्या सातत्याने वाढत असल्याने पाण्याच्या कमतरतेस सामोरे जावे लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

• तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाणीपुरवठा योजना पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे सदर गावांना नियमित पाणीपुरवठा करण्यामध्ये सुधारणा होऊ शकेल.

• धायरी, शिवणे, उत्तमनगर या तीन गावांसह पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट होणाऱ्या सर्व गावांसाठी समान पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीकोनातून तज्ञ सल्लागार नेमण्याची प्रक्रिया पुणे महानगरपालिकेने सुरु केली आहे.

• तसेच पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना पुणे शहराच्या अन्य भागांप्रमाणे सुव्यवस्थित पाणीपुरवठा व इतर सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत पुणे महानगरपालिकेस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (मुंबई) येथील पत्रा चाळीच्या पुनर्विकासात झालेला गैरव्यवहार

**(४८) * १३४९६१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील पत्रा चाळीच्या पुनर्विकासात बांधण्यात आलेल्या सदनिका म्हाडाच्या संमतीशिवाय परस्पर बाजारात विकून हजारो कोटींच्या गैरव्यवहार झाल्याप्रकरणी मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार नियुक्त केलेल्या श्री.जॉनी जोसेफ चौकशी समितीने आपला अहवाल मा.मुख्यमंत्री यांचेकडे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालात विकासकावर ठपका ठेवण्यात आला असून, मूळ संयुक्त विकास करारनाम्यात परस्पर बदल करुन भाडेकरुंच्या इमारती तसेच म्हाडाच्या हिश्श्याच्या इमारतीही म्हाडाला न देताच खुल्या बाजारात त्याची विक्री करण्यात येऊन हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी विकासकासह म्हाडाच्या तसेच मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द मुंबई पोलीसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे गुन्हा दाखल करण्याची शिफारस करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व अहवालातील शिफारशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

गोरेगाव, मुंबई येथील पत्राचाळीच्या पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात शासनाने नेमलेल्या जॉनी जोसेफ चौकशी समितीने त्यांचा अहवाल शासनास दि २७.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर चौकशी समितीच्या अहवालातील भाग-१/प्रकरण-८/मुद्दा-ग मध्ये “गुरुआशिष यांनी त्रयस्थ विकासकांना विक्री क्षेत्रातील हस्तांतरीत केलेले विकास अधिकार” या शिर्षकाखाली चौकशी समितीने याबाबत आपले निष्कर्ष व शिफारशी नोंदविले असून या जमिनीच्या विक्री/ हस्तांतराबाबतचे सर्व व्यवहार हे बेकायदेशीर ठरतात, असे नमूद केले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

चौकशी समिती अहवालातील भाग-१/प्रकरण-८ मधील मुदा क्र. ड मध्ये गुरुआशिष यांच्यावर फौजदारी संहितेतील कलमांनुसार कडक कारवाई बाबत ज्येष्ठ विधीज्ञ श्री. कामदार यांनी शिफारस केली असून सदर शिफारसीनुसार म्हाडाने/शासनाने त्या दृष्टीने त्वरीत पावले उचलावी अशी समितीने शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने यापूर्वीच म्हाडातर्फे दि. १३.०३.२०१८ रोजी प्रथम खबरी अहवाल क्र. ८५/२०१८ अन्वये “विकासक मे.गुरुआशिष कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि. व त्यांचे संचालक व इतर” यांचेविरुध्द आर्थिक गुन्हे विभागाकडे गुन्हा दाखल केला आहे.

(४) सदर जॉनी जोसेफ चौकशी समितीच्या अहवालास शासनाची मान्यता देण्यात आली आसुन शासनाच्या दि. १०.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदरहू अहवाल म्हाडाकडे पाठविण्यात आलेला आहे व त्यामधील शिफारशींच्या अनुषंगाने म्हाडाचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण तालुक्यातील (जि.रायगड) खाडी किनारे व बंदरे असुरक्षित असल्याबाबत

**(४९) * १३५८७४ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) खाडी किनारे व बंदरे सध्या तेल, डिझेल, सोने, चंदन व इतर मौल्यवान वस्तूंची तस्करी व चोरट्या व्यापा-यांचे केंद्रबिंदू असल्याने हे खाडी किनारे व बंदरे असुरक्षित असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व तदनुसार शासनाने बंदरे व खाडी किना-यांच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. उरण पोलीस ठाणे व मोरा सागरी पोलीस ठाणे येथे सन २०१८ मध्ये समुद्रकिनारी डिझेल चोरीबाबत, प्रत्येकी  एक गुन्हा दाखल आहे.तथापि सन २०१९ मध्ये खाडी किनारे, बंदरे येथे तेल, डिझेल, सोने, चंदन व इतर मौल्यवान वस्तुंची तस्करी बाबत गुन्हे दाखल नाहीत.

(२) उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सन २०१८ मध्ये समुद्रवाटे डिझेल चोरीचा एक गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले असून त्याचा कोर्ट केस नं. आरसी १२७/२०१८ दि.२९.८.२०१८ असा आहे.

तसेच मोरा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ०००५/२०१८ अत्यावश्यक वस्तू अधिनियम १८५५ चे कलम ३(२)(क)(घ), ७ गुन्ह्यांचा तपास पुर्ण झाला असून सदरचा गुन्हा तपासणीकरीता सनियंत्रण समितीकडे पाठविण्यात आला आहे.

मोरा सागरी पोलीस ठाणे एन.सी. नं. १/२०१८ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२४ आरोपी तपासात सहकार्य करत नसल्याने आरोपी अटक करुन दोषारोपपत्र सादर करणेवर आहे.

(३) १) उरण पोलीस ठाणेच्या हद्दीत समुद्रकिनारी सागरी सुरक्षा शाखेतील पोलीस कर्मचारी तसेच उरण पोलीस ठाण्याकडील बिट मार्शल कर्तव्यावर असणारे पोलीस कर्मचारी हे दिवसा व रात्री पेट्रोलींग करतात

२) गस्ती दरम्यान सागरी सुरक्षा रक्षकांची मदत घेतली जाते.

३) गस्ती दरम्यान काही संशयास्पद घडल्यास त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाते.

४) उरण पोलीस ठाणे हद्दीतील सागर रक्षक दल व ग्रामरक्षक दल यांच्या मिटींग घेवून त्यांना समुद्रामध्ये घडणाऱ्या संशयीत हालचालींबाबत माहिती देण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

५) सागरी सुरक्षततेच्या अनुषंगाने बोकडविरा चेकपोस्ट येथे नाकाबंदी नेमुन संशयित वाहनांची व इसमांची तपासणी करण्यात येत आहे.

६) सी.आय.एस.एफ. ची देखील सुरक्षा नेमली जाते तसेच त्यांचे मार्फतीने व स्थानिक पोलीस ठाणेकडून प्रवाशांची तपासणी केली जाते. मच्छिमाराकरिता समुद्रात गेल्यावर संशयित बोटी, इसम असे आढळून

आल्यास त्याबाबत स्थानिक पोलीस ठाणेस, नवी मुंबई कंट्रोल रुम कोस्टगार्ड यांना तसेच १०९३ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील डोंबिवली विभागातील प्रभाग क्र.७३ मध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५०) * १३९८१२ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील डोंबिवली विभागातील प्रभाग क्र.७३ मध्ये पेव्हर ब्लॉक बसविताना मंजूर कामाव्यतिरिक्त दुसऱ्या ठिकाणी काम केल्याचे महानगरपालिकेच्या शहर अभियंत्यांच्या अहवालात माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवागाव, आनंदनगर-ठाकूरवाडी परिसरातील प्रदीप सोसायटी ते शिवाजी पार्क सोसायटीपर्यंत रस्ता तयार करुन पायवाट बनविणे आणि पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामात महानगरपालिकेचे अधिकारी आणि ठेकेदार यांनी संगनमत करुन गैरव्यवहार केल्याची तक्रार नगरसेवकांनी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, तद्‌नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार पेव्हर ब्लॉक बसविणाऱ्या कंत्राटदाराची निविदा रद्द करुन काळ्या यादीत टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अजर्दार श्री.रमेश पद्माकर म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेता, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी दि. २४.०१.२०१८ रोजी याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली, ही वस्तुस्थिती आहे.

(३) • अर्जदार श्री.रमेश म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेता, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे तक्रारीचे अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सदर तक्रारीतील विषय त्यांचेकडे यापुर्वी प्राप्त तक्रार अर्जातील मजकुराप्रमाणेच असल्याने योग्य त्या कार्यवाहीसाठी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे पाठविली आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने सदर प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी करणेकरीता दि. २२.०१.२०१९ अन्वये सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला असून महासभेच्या मान्यतेनंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

• सदर प्रस्तावास ९० दिवसापेक्षा जास्त कालावधी झाल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५३ च्या अनुसूची-ड मधील प्रकरण-२ च्या नियम-१स प्रमाणे सदर प्रकरणात पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

• सदर प्रकरणी मंजूर कामाऐवजी दुसरे काम करण्यामध्ये संबंधित कंत्राटदाराचा दोष दिसून येत नसल्याने त्यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून खरेदी केलेल्या कीटकनाशक औषधांच्या निविदा प्रक्रियेची चौकशी करण्याबाबत

**(५१) * १३६९५८ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून कीटकनाशक औषधे खरीदी करण्याची प्रक्रिया शासन निर्णयानुसार नसून ठेकेदाराच्या व अधिकाऱ्यांच्या संगनमताने एका विशिष्ट कंपनीच्या नावाचा उल्लेख करून निविदा मागविण्यात आली असल्याने याची चौकशी करण्याची मागणी मा. आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार विशिष्ट कंपनीचा उल्लेख न करता निविदा प्रक्रिया करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या नियमांची पायमल्ली करून निविदा प्रक्रिया राबविणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार खरेदी प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग/कार्यालयांना उक्त धोरण बंधनकारक आहे. निविदा प्रक्रिया राबविण्याकरीता स्पष्ट सूचना व निर्देश आहेत. तसेच कुठल्या एका पुरवठादारास लाभ होईल अशा निर्बंधित अटी व शर्ती टाकण्यास निर्बंध आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना दोन आठवड्यात चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या तसेच चौकशीतील निष्कर्षांच्या अनुषंगाने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील शासनाची जमीन खासगी जमीन असल्याचे दाखवून केलेला गैरव्यवहार

**(५२) * १३५८१४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील शासनाची जमीन खासगी जमीन असल्याचे दाखवून संगनमताने गैरव्यवहार केल्याप्रकरणी महानगरपालिका प्रशासनाने स्वतंत्र चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्याची शिफारस तहसीलदार, कल्याण यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास महानगरपालिकेकडे केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर परिसरामध्ये शासकीय जमीनीवर अतिक्रमणे करुन जमीनी हडप करणारे रॅकेट कार्यरत असल्याने सबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • श्री.प्रकाश भोईर, गटनेता यांनी मौजे गावदेवी, डोंबिवली येथील जमिनीचे टी. डी. आर. प्रदान करताना झालेली अनियमितता व मालकी हक्काबाबत मा. लोक आयुक्त यांचेकडे तक्रार केली होती.

• दि. ०५.०८.२०१६ रोजी झालेल्या सुनावणीत मा.उप लोक आयुक्त यांनी टी. डी. आर. बाबत नगर विकास विभागाने तर जमिनीच्या मालकीबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांनी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

• मा.उप लोक आयुक्त यांच्या आदेशास अनुसरून जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे चौकशी सुरू आहे.

• नगर विकास विभागाने दि. ८.११.२०१६ च्या पत्रान्वये आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना विभागीय चौकशी करण्याचे अनुषंगाने कारणे दाखवा नोटीस देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

• त्याअनुषंगाने सर्व संबंधितांना आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कारणे दाखवा नोटीस बजाविलेल्या आहेत.

• सदर प्रकरणी १ महिन्याच्या आत कार्यवाही अंतिम करून अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीवर अतिक्रमणे आढळून आल्यास विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार वेळोवेळी बांधकाम निष्कासनाची कार्यवाही केली जात असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## अमरावती (जि.अमरावती) येथील सहायक पोलीस उपनिरिक्षकाने केलेली आत्महत्या

**(५३) * १३४८८० श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप**

**(अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (जि.अमरावती) येथील कोतवाली पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस उपिनिरिक्षक पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्याने त्यांना ११ महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे दिनांक १२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास गळफास लावून आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कोतवाली पोलीस ठाण्यात कार्यरत सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक यांनी दिनांक ११/०३/२०१९ रोजी त्यांच्या राहत्या घरी गळ्याला फास घेऊन आत्महत्या केली. याबाबत प्राप्त तक्रारीवरुन फ्रेजरपूरा पोलीस स्टेशन येथे आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सदर कर्मचारी हा कर्तव्यावर असतांना नेहमी गैरहजर व अनधिकृतपणे आजारी रजेवर राहण्याच्या सवयीचा होता. गैरहजर राहण्याच्या सवयीमूळे स्वत: मानसिक दबावात येवून आत्महत्या केल्याचे चौकशीत दिसून आले आहे. मृतक सहाय्यक पोलीस उप निरिक्षक, हे सिटी कोतवाली पोलीस स्टेशन येथे कार्यरत असतांना दिनांक २८/११/२०१८ ते दिनांक १४/२/२०१९ पर्यंत असे एकूण ७९ दिवस कर्तव्यावर अनुपस्थित होते. त्यांच्या खाती कुठल्याही प्रकारची रजा शिल्लक नसल्याने ७९ दिवसांपैकी १८ दिवस असाधारण (विनावेतन) रजा मंजूर करण्यात आली होती. मृतकाची पत्नी शासकीय सेवेत कार्यरत असल्याने वेतन न मिळाल्यामुळे आत्महत्या केली असे म्हणणे संयुक्तीक नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ब्रीज वाडी शिवारातील (जि.औरंगाबाद) महानगरपालिकेच्या भुमिगत गटारातील मॅनहोलमध्ये उतरलेल्या शेतकऱ्यांचा गुदमरुन झालेला मृत्यू

**(५४) * १३६७९५ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील ब्रीज वाडी शिवारातील महानगरपालिकेच्या भुमिगत गटारातून शेतीला पाणी घेण्याकरिता विद्यूत मोटार पंप दुरुस्त करण्यासाठी मॅनहोल मध्ये उतरलेल्या ७ शेतकऱ्यांपैकी ३ शेतकऱ्यांचा विषारी वायूमुळे गुदमरुन मृत्यू झाल्याची घटना दिनांक १७ मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून अन्य चार शेतकऱ्यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना तसेच गंभीर जखमी झालेल्या व्यक्तींना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील ब्रीजवाडी शिवाराच्या लगत असलेल्या भागातील व्यक्ती हे शेती व भाजीपालाचे उत्पादन घेण्याच्या कामी मलजल वाहिनीच्या मॅनहोल चेंबरचे झाकण उघडून त्यातून विद्युत मोटारद्वारे अनधिकृतपणे जलमलाचा उपसा करीत असताना दिनांक १८ मार्च,२०१९ रोजी एकूण चार व्यक्तींचा मृत्यू झालेला असून अन्य तीन व्यक्ती जखमी झाल्या होत्या, हे खरे आहे.

(२) • या सदंर्भात सदरहु व्यक्ती हया शेतीसाठी विद्युत मोटारीद्वारे मलजलाचा उपसा करीत असताना सदर विद्युत मोटार नादुरुस्त झाल्यामुळे संबंधित व्यक्ती मॅनहोलमध्ये उतरली असता त्यांचा गुदमरुन मृत्यू झाला आहे.

• महानगरपालिकेने यापूर्वी वारंवार या भागातील अनधिकृतरित्या प्रतिबंधीत मलजलाचा उपसा करणाऱ्या व्यक्तींविरुध्द विद्युत मोटार जप्तीची कार्यवाही केली असून, संबंधितांना सबब बाब कायद्याच्या दृष्टीने अयोग्य असल्याचे वेळोवेळी प्रत्यक्ष प्रबोधन करुन तसेच स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन देवून निदर्शनास आणलेले आहे.

• तथापि,राज्य शासनाने सन २०१७ मध्ये सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण निश्चित केलेले असुन त्यानुसार महानगरपालिकेमार्फत प्रक्रीया केलेले प्रक्रियायुक्त सांडपाणी हे औद्योगिक विद्युत केंद्रे, औद्योगिक केंद्रे, रेल्वे/ बल्क बायर्स व कृषि व अन्य पिण्यायोग्य नसलेल्या प्रयोजनार्थ पुनर्वापर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

• औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत युआयडी एसएसएमटी अंतर्गत मल:निस्सारण प्रकल्प राबविण्यात येत असून त्यामधून प्रक्रिया होणारे सांडपाणी हे औद्योगिक विद्युत केंद्रे, औद्योगिक केंद्रे, रेल्वे/ बल्क बायर्स व कृषि व अन्य पिण्यायोग्य नसलेल्या प्रयोजनार्थ उपलब्ध करुन देण्याचे औरंगाबाद महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(३) सदर घटना कायद्याने प्रतिबंधित असल्यामुळे संबंधित मृत अथवा जखमी व्यक्तींना कोणतीही मदत औरंगाबाद महानगरपालिकेकडून देण्यात आली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बी.डी.डी. चाळ परिसरातील (वरळी, मुंबई) साधना हाउस या इमारतीस लागलेल्या आगीबाबत

**(५५) * १३४९९५ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बी.डी.डी. चाळ (वरळी, मुंबई) येथील साधना मिलच्या परिसरात तीन मजल्याच्या साधना हाउस या इमारतीस दिनांक २९ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास भीषण आग लागली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीत अनेक औद्योगिक संस्थांचे गाळे असून या इमारतीत अनेक ठिकाणी बेकायदेशीर अंतर्गत फेरबदल करण्यात आले होते तसेच या इमारतीच्या तळमजल्यावर साठवून ठेवण्यात आलेल्या रसायन आणि औषधांच्या साठ्यामुळे आग लागल्यास मोठी भर पडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आगीची सखोल चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती तातडीने नेमण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने सदर घटनेची चौकशी शासनाने निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती मार्फत केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानूसार दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वरळी येथील बी.डी.डी. चाळ परिसरातील साधना हाऊस इमारतीमधील मे.रिलायन्स लाईफ सायन्स प्रा.लि. येथे दिनांक २९ डिसेंबर, २०१८ रोजी १६.४७ च्या सुमारास आग लागली होती.

सदर आग अग्निशमन दलाच्या १६ मोटर पंप व ७ लाईनच्या सहाय्याने दिनांक ३०.१२.२०१८ रोजी पहाटे ०४.१५ च्या सुमारास विझवली. या दुर्घटनेमध्ये जीवित हानी झाली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर इमारतीमध्ये अंतर्गत फेर बदलाकरिता महानगरपालिकेमार्फत दिनांक ०९.०८.२००४ रोजी मंजूरी देण्यात आली होती.

तसेच तळ मजला येथील मे.रिलायंस इंडस्ट्रीस यांना Biotech Manufacturing म्हणून व अंतर्गत फेर बदल करण्याकरिता दिनांक ०२.१२.२००३ अन्वये मंजूरी दिलेली असून, प्रयोगशाळेला मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३९४ अन्वये रासायनिक औषधे वापरण्याकरिता परवाना देण्यात आला होता.

इमारतीच्या तळमजल्यावर रसायन आणि औषधांच्या प्राक्रिया करण्याकरिता तसेच वापरण्यात येणा-या यंत्रणांकरीता महानगरपालिकेमार्फत परवाना देण्यात आला असून त्याची वैधता दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंत होती.

सदर आगीची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, आगीचे कारण “सदोष विद्युत प्रणाली” असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४), (५) व (६) लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ३१.१२.२०१८ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले असून प्रथमत: आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांकडून हॉटेल व्यावसायिकांची होत असलेली आर्थिक लूट

**(५६) * १३९०२५ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, लोअरपरेल येथील कमला मिलला लागलेल्या आगीनंतर सहाय्यक आयुक्त, जी/दक्षिण विभाग यांची तात्काळ के /पूर्व विभागाच्या सहाय्यक आयुक्तपदी बदली करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, के /पूर्व विभागाच्या सहाय्यक आयुक्तपदी नियुक्ती झाल्यापासून के /पूर्व विभागातील पंचतारांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट, बार व इतर हॉटेल्सची महानगरपालिकेच्या इमारती व कारखाने विभाग, वैद्यकीय अधिकारी, अग्निशमन दल यांचे एकत्रित पथक बनवून तपासणी करून त्यांना महानगरपालिका अधिनियमाद्वारे नोटीस देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील दीड वर्षात के/पूर्व विभागाने एकूण किती हॉटेल्सची तपासणी केली व किती हॉटेल्सना नोटीस दिल्या आहेत याची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार लेखी मागवूनही सहाय्यक आयुक्त, के /पूर्व विभाग यांनी माहिती उपलब्ध करून दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हॉटेल्सची तपासणी करून महानगरपालिका अधिनियमाद्वारे नोटीस बजावूनही के /पूर्व विभागातील एकही पंचतारांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट, बार यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कमला मिलच्या नावाखाली हॉटेल व्यावसायिकांना कारवाई करण्याची भिती दाखवून के /पूर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासन सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार वा करित आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २४ प्रभागांमध्ये अग्निसुरक्षेच्या दृष्टीने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करण्याकरिता महानगरपालिकेचे अग्निशमन विभाग, इमारत व कारखाने आणि आरोग्य विभाग यांचे एकत्रित पथक तयार केले आहे.

सदर पथकामार्फत हॉटेल्सची दैनंदिन तपासणी करुन त्यांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलमांनुसार नोटीसा देण्यात आल्या असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागामार्फत जानेवारी, २०१८ पासून आतापर्यंत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत ५४२ आस्थापनांची तपासणी करुन ५२६ प्रकरणांमध्ये न्यायालयीन खटले दाखल करण्यात आले आहेत.

• इमारत व कारखाने विभागामार्फत ५४२ आस्थापनांची तपासणी करुन १३२ ठिकाणी निष्कासन करण्यात आले आहे.

• महानगरपालिकेच्या संयुक्त पथकामार्फत २९५ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून, १६७ आस्थापनांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

सदर माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींना महानगरपालिकेच्या विभागीय बैठकीमध्ये अवगत करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

तथापि, के/पूर्व विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींना लेखी स्वरुपात अवगत करण्याबाबतच्या सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमानुसार कारवाई करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईत विमानतळ पुनर्वसन प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(५७) * १३५७८६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विमानतळ पुनर्वसन क्षेत्रात सिडकोने जारी केलेल्या २५० कोटी रुपयांच्या कामात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी २५० कोटी रुपयांच्या कामासह १० वर्षातील सर्व कामांची चौकशी करुन कारवाई करण्याकरिता समिती स्थापन करण्याचे आदेश माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान पंतप्रधान कार्यालयाने राज्याच्या ऊर्जा मंत्री यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीने शासनास सादर केलेल्या चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानूसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पुनर्वसन क्षेत्रात विद्‌युत पुरवठा व त्याबाबतच्या पायाभूत सुविधांचे काम महावितरण विभागाच्या पर्यवेक्षण व देखरेखीखाली ई-निविदा मागवून करण्यात येत आहे. सदर कामासाठी काढण्यात आलेल्या ई-निविदांचे तांत्रिक व आर्थिक मुल्यांकनासाठी मुख्य अभियंता, सिडको, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली असून उक्त समितीच्या शिफारशीनंतर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेनुसार कामे प्रदान करण्यात आली आहे.

मा.मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८.९.२०१८ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सिडकोमार्फत गत १० वर्षाच्या कालावधीत केलेल्या विद्युत विषयक कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी सेवानिवृत्त मुख्य अभियंता (महावितरण) यांच्या अध्यक्षतेखाली त्रयस्थ समिती स्थापन करण्याचे निदेश दिले आहेत. याबाबतचा अहवाल अद्यापी प्राप्त झालेला नसून सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे प्रयोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील दादर येथे इंदू मिल परिसरात उभारण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाबाबत

**(५८) * १३५८३१ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील**

**(कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर येथील इंदू मिलच्या १२५ एकर जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक १४ एप्रिल, २०२० पर्यंत पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील तीन वर्षांपासून १४ एप्रिलला डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीला शासनाकडून आश्वासन दिले जात आहे परंतू आतापर्यंत या जागेवर एक विट ही उभारली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील स्मारकासाठी आवश्यक असणारे आराखडा, परवानग्या, कामाची निविदा व प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली नसल्यामुळे मागासवर्गीय समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्मारकासाठी शासनाकडून देण्यात आलेल्या आश्वासनाप्रमाणे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर कामाच्या निविदा अंतिम होऊन दि. ०९/०२/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सदर निविदेचा कालावधी ३६ महिने असुन काम ०८/०२/२०२१ रोजी पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्मारकाच्या विकासाकरीता दि. ०८/०३/२०१८ रोजी उत्खननाची व शोअर/शीट पाईलींग करीता परवानगी दिली आहे. तसेच दि. ०९/०७/२०१८ रोजी अभिन्यास मंजूरी व किनारा तटीय नियमावलीच्या तरतुदी लागु नसलेल्या क्षेत्रामध्ये स्थित असलेल्या संशोधन केंद्राच्या इमारतीस जोत्यापर्यंत बांधकाम परवानगी (२०,००० चौ.मी. पेक्षा

कमी बांधकाम क्षेत्र) दिली आहे. आजतागायत १३५४ शोअर पाईल, ७०० मेन पाईल, १,१६,००० घनमीटर जमिनीचे खोदकाम, १६% राफ्ट फांऊडेशन, प्रवेश दालनाचे ५०% पायाचे काम, इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत.

सदर स्मारकाचे प्रत्यक्ष काम दि.०९/०२/२०१८ पासुन सुरु झाले असून, दि. ०८/०२/२०२१ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मुंबईमधील म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील रहिवाशांवर लादण्यात आलेला वाढीव सेवा शुल्क माफ करण्याबाबत

**(५९) * १३८३८७ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाने मागील २१ वर्षांचे थकीत सेवाशुल्क भरण्यासाठी आग्रही भूमिका घेतल्याने अनेक गृहनिर्माण संस्थांना लाखो रुपयांचे बिल पाठविण्यात आले असल्याने रहिवाशी त्रस्त झाले असून स्थानिकांमध्ये रोष निर्माण झाला असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या विविध वसाहतीतील थकीत सेवाशुल्कावरील व्याज व दंडाची रक्कम माफ करण्याबाबतचा निर्णय शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने निर्णय घेवून गृहनिर्माण संस्थांना थकीत सेवाशुल्कावरील व्याज व दंडाची रक्कम माफ करुन सुधारित बिलांची आकारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मुंबईतील म्हाडा वसाहतींच्या थकित/वाढीव सेवा शुल्कासंदर्भात मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली मा.विधानमंडळ सदस्यांची समिती दि.२७.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या के वेस्ट वार्डातील मे.मिलेनियर रियालीटी या विकासकाने अनधिकृतपणे इमारत बांधकाम केल्याबाबत

**(६०) * १३८३०१ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या के वेस्ट वार्डातील अंधेरी सब वे, एसव्ही रोड येथील मे.मिलेनियर रियालीटी या विकासकाने सी.टी.एस.नं. ६५, ६६ ए ६६ (PT), १ ते ५१ येथील नाल्याला अनधिकृतपणे बंदिस्त करुन नियम डावलून विना परवानगी नैसर्गिक नाल्याची रुंदी कमी करुन नाल्यावर अनधिकृतपणे इमारतीचे बांधकाम केल्याबाबतची तक्रार सन २०१४ पासून सातत्याने तसेच दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री तसेच आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे श्री. शकील पटनी यांनी व लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नाल्याची रुंदी कमी करुन बंदिस्त करण्याची परवानगी विकासकाला मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने, इमारत प्रस्ताव (swo) व मलनि:सारण विभाग यांनी दिलेली नसून सर्व विभाग एकमेकांवर परवानगी दिल्याबाबत आरोप प्रत्यारोप करुन तक्रारदाराची व शासनाची दिशाभूल करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी विकासकाने बनावट कागदपत्रे तयार केल्याबाबत त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे, ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली तसेच नाल्यावरील अनधिकृत इमारत निष्कासित करण्याबाबत व नैसर्गिक नाला पुर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत वस्तुस्थिती आहे.
(२) सदर ठिकाणी नाल्याची रुंदी कमी करण्यात आली नसून ती किमान ६.५ मीटर करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाच्या अभिप्रायानंतर, सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीने सदर नाला बंदिस्त करण्याची परवानगी विकासकाला देण्यात आली असून, विकासकाला अंशत: पूर्णत्व प्रमाणपत्र देण्यात आल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर बाब खरी नसल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी कळविले आहे.
(४) व (५) विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या अधिन राहून नाल्याच्या भिंतीपासून सरासरी १.९० मीटर ते ४.९० मीटर अंतर सोडून इमारत आराखडे मंजूर करुन बांधकामास परवानगी देण्यात आले असल्याचे झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरणाने कळविले आहे.

-----------------

## गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात १५ जवान शहीद झाल्याबाबत

**(६१) * १३५०८३ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा),**

**अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील जांबूळखेडा-लेंडारी मार्गावर नक्षलवाद्यांनी दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास भूसुरुंगाच्या केलेल्या भिषण स्फोटात १५ जवानांना हौतात्म्य पत्करावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापुर्वी गडचिरोली जिल्ह्यातील दादापूर येथे रस्ता बांधकामातील ३६ वाहने व डांबर प्लांट दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास जाळून नक्षलवाद्यांनी कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामूळेच १५ जवानांना हौतात्म्य पत्करावे लागले असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) असल्यास, नक्षलवाद्यांच्या कारवायांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने व हुतात्म्यांच्या नातेवाईकांना आणि जखमींना आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. दादापूर गावात उभी असलेली २७ वाहने व ९ मशिनरीजचे डिझेल टँक फोडून त्यातील डिझेल वाहनांवर ओतून वाहनांची जाळपोळ व मोडतोड केली. त्यामुळे रु.७,१८,०८,४७४/- रुपये किमंतीचे खाजगी मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

(३) व (४) सदर घटनेबाबत पोलीस महानिरिक्षक, गडचिरोली परिक्षेत्र यांच्यामार्फत सखोल चौकशी सुरु आहे. उप विभागीय पोलीस अधिकारी यांचा निष्काळजीपणा आहे किंवा कसे याबाबत उच्च स्तरावर चौकशी चालू आहे.

(५) नक्षलवाद्यांच्या कारवायांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत :-

(१) शासनाने नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था, वाहन व्यवस्था, भुसूरुंग प्रतिबंधक वाहने व हेलिकॉप्टर उपलब्ध करुन दिले आहेत.

(२) जिल्ह्यातील नक्षलवाद्यांच्या कारवायांवर अंकुश लावण्यासाठी जिल्हा पोलीस तसेच केंद्रीय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येते.

(३) जिल्ह्यात नक्षलविरोधी कृतीकरिता केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालियन, कोब्रा बटालियन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तसेच सी-६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जवानांना युद्धप्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. नक्षलविरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालींवर प्रतिबंध आणण्यात येत आहे.

शहीद १५ जवांनाच्या वारसांना शासनाकडून सानुग्रह अनुदान म्हणून प्रतीव्यक्ती रुपये २५,००,०००/- याप्रमाणे एकूण रु.३,७५,००,०००/- व सदनिकेची किंमत म्हणून द्यावयाची रक्कम प्रती व्यक्ती रु.२२,५०,०००/- याप्रमाणे एकूण रुपये ३,३७,५०,००० असे एकूण ७,१२,५०,०००/- मदत गृह विभाग, शासन ज्ञापन क्र.पोनुभ-०२१९/प्र.क्र.१०७/पोल-७, दि.१०.०५.२०१९ अन्वये मंजूर करण्यात आली आहे. तसेच, केंद्रीय सुरक्षा निधीमधून प्रत्येक वारसाला रु.२०,००,०००/- असे एकूण रु. ३,००,००,०००/- सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे. मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रुपये

२०,५०,०००/- प्रमाणे एकूण ३,०७,५०,०००/- मुख्यमंत्री सचिवालयाच्या दि.२२.०५.२०१९ च्या पत्रान्वये मंजूर करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाकडून काढण्यात आलेल्या विम्याची रक्कम रुपये १०,००,०००/- असे एकूण १,५०,००,०००/- मंजूर करण्यात आले आहे. शहीद पोलीस कर्मचारी विवाहीत असल्यास त्यांच्या पत्नीस व अविवाहीत असल्यास शहीदाच्या आईस निधी अदा करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कालिका या बनावट पतसंस्थेने २०० हून अधिक खातेदारांची केलेली फसवणूक

**(६२) * १३६६१३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कालिका या बनावट पतसंस्थेने २०० हून अधिक खातेदारांची सुमारे १३ कोटीहून अधिक रुपयांची फसवणूक करुन पळ काढला असल्याचे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पतसंस्थेची कोणत्याही प्रकारची नोंदणी केलेली नसताना गत ८ वर्षापासून त्यांचे कामकाज सुरु होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनाने सदर पतसंस्थेच्या प्रमुखांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी कुरार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५८८/२०१८, भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९, कलम ३ व ४ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे गु.र.क्र. १/१९ अन्वये वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यात भरतीचे पाणी अडविण्यासाठी असलेली यंत्रणा सक्षम करण्याबाबत

**(६३) * १३५८७९ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यात धारण तलावात गाळ साचल्याने तसेच भरतीचे पाणी परिसरात येऊ नये म्हणून पाणी अडविण्यासाठी उभारण्यात आलेली यंत्रणा निकामी झाल्याने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ रोजी व दिनांक २० मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास कुंडे गावात पाणी शिरले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गावात पाणी शिरु नये याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांच्या दि.५.१०.२०१८ रोजीच्या पत्रानुसार द्रोणागिरी नोडमधील धारण तलावामधील असलेल्या कांदळवनास बाधा पोहचू नये म्हणून सदर तलावांना लावलेल्या झडपा उघड्या ठेवण्याचे निर्देश सिडकोस प्राप्त झाले होते. त्यामुळे दिनांक

२१ फेब्रुवारी, २०१९ रोजी व दिनांक २० मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास कुंडे गावात पाणी शिरले होते.

(२) विभागीय आयुक्त, कोकण यांच्या निर्देशानुसार कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या दि.२२.५.२०१९ रोजीच्या पत्रानुसार सिडकोला कांदळवनाचे संरक्षण व रहिवाश्यांच्या समस्या विचारात घेता तलावाच्या पाईप आऊटलेटला बसविलेल्या झडपा खुल्या कराव्यात व पावसाळ्यात सदर झडपा बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, सदर ठिकाणी पावसाळ्यात पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता सिडकोमार्फत घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पारगांव, पारगांव डूंगी व कोल्ही आदी गावांतील (जि.रायगड) शेतकऱ्यांना विद्‌युत वाहिन्यांखाली असलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(६४) * १३४९१९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोद्वारा नवी मुंबईत उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामासाठी उरण आणि पनवेल तालुक्यातील १० गावांतील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व मुळ गावांतील घरे संपादित केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विमानतळ गाभा क्षेत्रातून टाटा पॉवर कंपनीची अति उच्च दाबाची (Overhead Line) वाहीनी जात असल्याने सदर विद्युत वाहिनी जमिनीखालून टाकण्याचे (भूमिगत) काम सिडकोने सुरु केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विद्यूत वाहिन्यांखाली असलेल्या जमिनीच्या संपादनापोटीचा मोबदला मिळावा यासाठी पारगांव, पारगांव डूंगी व कोल्ही आदी गावांतील शेतकऱ्यांनी शासनाकडे व आयुक्त, महसूल यांच्याकडे लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याकरिता सिडकोने सन २०१४ मध्ये कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करुन अहवाल देण्याबाबत सांगूनसुध्दा विभागीय आयुक्त, कोकण यांनी अद्याप अहवाल दिला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) नाही.

टाटा पॉवर कंपनीची अति उच्च दाबाची (Overhead Line) वाहीनी सिडकोने विमानतळ गाभा क्षेत्रातून जमिनीखालून (भूमिगत) टाकण्याचे काम टाटा कंपनीमार्फत करण्याचे विचाराधीन आहे. तथापि, सदर काम अद्याप विमानतळ गाभा क्षेत्रात सुरु करण्यात आलेले नाही.
(३), (४) व (५) होय.

शासन निर्णय क्र.सिआयडी-३३१४/प्र.क्र.१४/नवि-१०, दि.३०.०४.२०१४ नुसार नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या हद्दीत येणाऱ्या कोपर येथील नगरपरिषदेच्या मल:निस्सारण योजनेसाठी पुर्वी संपादित केलेल्या पारगांव,

पारगांवडुंगी व वाघिवली येथील टाटा विद्युत वाहिनीखाली पूर्वी संपादित केलेल्या जमिनींच्या अधिकार अभिलेखात पीक पाहणी सदरी नाव असलेल्या व्यक्तींना किती सानुग्रह अनुदान देणे शक्य आहे. याबाबतीत अभ्यास करुन उचित निर्णय घेऊन सिडकोला अहवाल सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीची शेवटची बैठक दि.२९.०५.२०१९ रोजी पार पडली असून उक्त समितीचा अहवाल सिडको महामंडळाकडे प्राप्त झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## ऑर्थर रोड कारागृह परिसरातील चाळींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(६५) * १३५३०९ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑर्थर रोड कारागृह परिसरातील १४१ टेनामेंट चाळ, पारशीवाडी चाळ कमिटी, मनमोहन व मेघनगर सहकारी गृहनिर्माण संस्था या चाळींचा पुनर्विकास खासगी विकासकाकडून करण्यात येत असून या चाळी जमीनदोस्त करून आजमितीस १० वर्षे झाली तरीदेखील विकासकाने आजतागायत एकाही नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चाळींतील रहिवाश्यांना नवीन इमारतीचे बांधकाम होईपर्यंत अन्य ठिकाणी भाडेस्वरुपात पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात आल्या असून या पर्यायी जागांचे दरमहा भाडे रहिवाश्यांना देण्यास विकासकाकडून विलंब होत असल्याने या चाळींतील गोर-गरीब रहिवाशी सद्यस्थितीत आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानूसार आर्थर रोड कारागृह परिसरातील चाळींचा गत १० वर्षांपासून प्रलंबित असलेला पुनर्विकासाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे. ऑर्थर रोड कारागृह परिसरातील ग-दक्षिण विभागा अंतर्गत येणाऱ्या रामचंद्र हेजीब चाळ (मनमोहन व मेघनगर सहकारी गृहनिर्माण संस्था) पारसीवाडा या उपकर प्राप्त व ओम साई सदन या पुनर्रचित इमारतीच्या मिळकतीचा पुनर्विकास, विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) अंतर्गत करण्याबाबतचा प्रस्ताव विकासकामार्फत म्हाडास प्राप्त झालेला आहे. सदर इमारतींपैकी हेजीब चाळ व पारशीवाडा चाळ येथील इमारती तोडण्यात आलेल्या आहेत.

(२) सदर चाळीतील रहिवाशी / भाडेकरु यांची राहण्याची पर्यायी व्यवस्था विकासकामार्फत करण्यात आलेली आहे. तथापि, सद्य:स्थितीत विकासकाकडून तेथील रहिवाशी / भाडेकरु यांना पर्यायी जागेचे भाडे टप्या टप्याने उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे म्हाडाने कळविले आहे .

(३) गृह विभागाने महाराष्ट्र कारागृह (कारागृह इमारती व आरोग्य व्यवस्था) (सुधारणा) नियम, १९६४ मधील नियम ३ मध्ये सुधारणा करून कारागृह क्षेत्रामध्ये कोणत्याही बांधकामाची परवानगी देण्यासाठी संबंधित कारागृह विभागाचे व नियोजन प्राधिकरणाचे अधिकारी यांचा समावेश असलेली एक समिती गठित केलेली आहे. सदर समितीच्या सल्ल्याने बांधकामास परवानगी दिली जाते.

म्हाडाकडील अहवालानुसार सदर प्रस्तावास जेल प्राधिकरणांतर्गत नियुक्त झालेल्या समितीची मंजूरी नसल्यामुळे पुढील कार्यवाही झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील धर्मा कांबळे चाळीच्या दुरुस्तीकरिता परवानगी देण्याबाबत

**(६६) * १३९३२३ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागातील न.भू. मा. क्र.४८९, ४८९ - १ ते १५, मौजे-गुंदवली हा महानगरपालिकेच्या मालकीचा भूखंड असून तो

शासन राजपत्रानुसार गलिच्छ वस्ती म्हणून घोषित आहे व सदर भूखंडावरील धर्मा कांबळे चाळीतील रहिवाशांच्या घरात गत तीन वर्षांपासून पावसाळयात पाणी शिरुन त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चाळीतील रहिवाशांनी सन २०१६ पासून के/पूर्व विभाग कार्यालयाकडे घर दुरुस्तीची परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घर दुरुस्तीची परवानगी देण्यास महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून विलंब होत असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपायुक्त (परी-३) यांच्यासमवेत दिनांक २९ मे, २०१८ रोजी बैठक घेऊन त्वरीत दुरुस्तीची परवानगी देण्याकरिता मागणी केली असता उपायुक्त (परी-३) यांनी संबंधित अधिका-यांना घर दुरुस्तीची परवानगी त्वरीत देण्याच्या सूचना दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोकप्रतिनिधींनी सततचा केलेला पाठपूरावा व उपायुक्त (परी-३) यांनी सूचना देऊनही के/पूर्व विभागाचे सहाय्यक आयुक्त आणि इमारत कारखाने विभागाचे अधिकारी जाणूनबुजून सदर रहिवाशांना दुरुस्तीची परवानगी देत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, झोपडपट्टी निर्मूलन करुन किंवा घरांची दुरुस्ती करुन लोकांचे राहणीमान सुधारण्याकरिता शासन वेळोवेळी निर्णय घेत असते व त्या निर्णयाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कारवाई करुन सदर रहिवाशांना घर दुरुस्तीची परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सी.टी.एस. नं. ४८९, ४८९/१ ते १५, कांबळे चाळ, तेलीगल्ली, अंधेरी (पूर्व) हा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचा असून, सदर परिसर गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करण्यात आला आहे.

सदर परिसर सखल भूभागावर वसलेला असून, त्याठिकाणी पावसाळ्यात पाण्याचा निचरा उशीराने होत आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३), (४), (५) व (६) सदर चाळीतील १७ रहिवाशांपैकी १२ रहिवाशांनी त्यांच्या घरांची उंची १८ फुट पर्यंत वाढवून दुरुस्ती करण्याकरिता परवानगी मिळणेकामी दिनांक ०२.०६.२०१६ रोजी विनंती अर्ज दिला होता हे खरे आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने कागदपत्रांची छाननी केल्यानंतर सदर जागा ही बृहन्मुंबई महानगरपालिकेने खरेदी केली असल्याचे निदर्शनास आले.

गलिच्छ वस्तीतील घरांची उंची १४ फुटापर्यंत वाढविण्याच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २३.०४.२००३ रोजीच्या परिपत्रकातील तरतुदीनुसार अटींची पुर्तता झाल्यानंतर अर्जदारास घर दुरुस्तीस परवानगी देण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

-----------------

## प्रभादेवी (मुंबई) येथील श्री सिध्दीविनायक मंदिराच्या व्यवस्थापनाबाबत

**(६७) * १३५०८४ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या प्रभादेवी परिसरातील सिध्दीविनायक ट्रस्टने देवस्थानात १५८ कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांना शासनाने मंजूरी दिली असताना २१३ कर्मचारी कामावर असून मंजूरीविना ५५ कर्मचा-यांची नियुक्ती करुन त्यांना नियमित वेतन देण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून याबाबत हिंदू जनजागृती समितीने माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याखेरीज देवस्थानात ४४१ सेवेकरी नियुक्त केले असून, यापैकी निम्म्याहून अधिक सेवेकरी मंदिरात उपस्थित राहून सेवा न देता त्यांना दिलेल्या ओळखपत्राच्या आधारे स्वत: आणि आप्तेष्टांनाच थेट मंदिरात नेऊन दर्शन घडवून आणत असल्याचे शासनाने केलेल्या परिक्षणातून निदर्शनास आले असून मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विरोधात, ट्रस्टच्या अध्यक्षांनी तसेच माजी अध्यक्षांनी गैरव्यवहाराप्रकरणी लेखी तक्रार करुनही कारवाई केली नसल्याचे मा.मुख्यमंत्री यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर तक्रारींमध्ये नोटाबंदीच्या काळात मंदिरातून नोटा बदलून घेणे, महिला भक्तांना हाताने खेचून त्यांना अपशब्द वापरणे, मूर्तीची परस्पर खरेदी करुन देणगीदारांना देणे, देणगीदारांनी दिलेली १० लाख रुपयांची रक्कम मंदिरात जमा न करणे, अशा प्रकारचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, श्री.सिध्दीविनायक मंदिर हे महाराष्ट्र शासनाने विशेष कायदा संमत करून स्वतःच्या नियंत्रणात घेतले असतांनाही शासननियुक्त मंदिर व्यवस्थापन समितीने दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३१ ऑगस्ट, २०१६ या कालावधीत नियम व कायदे डावलून बेकायदेशीरपणे १२ लाख ९१ हजार २९१ रुपयांचा प्रवासखर्च केलाप्रकरणी आलेल्या तक्रारीनुसार सचिव दर्जाच्या अधिका-यांची चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

हिंदू जनजागृती समितीने माहे जुलै २०१८ मध्ये मा.मुख्यमंत्री यांचेकडे तक्रार केली होती हे खरे आहे.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास समिती, प्रभादेवी, मुंबई यांच्या आस्थापनेवरील १५८ पदांच्या आकृतीबंधास शासन निर्णय दि.१३/११/२००९ अन्वये मान्यता देण्यात आली होती. सद्यस्थितीत यापैकी ४० पदे रिक्त आहेत. मागील १० वर्षातील कामाची वाढलेली व्याप्ती पहाता काही कर्मचाऱ्यांची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात दैनंदिन रोजंदारीवर करण्यात आली. तद्नंतर कामाचा व्याप व न्यासाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने १३३ पदांच्या आकृतीबंधास दि.२५/६/२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

न्यासाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या सेवेक-यांच्या बाबतीत शासनाद्वारे परिक्षण करण्यात आले. शासनाने केलेल्या परिक्षणातून देवस्थानात ४४१ सेवेकरी नियुक्त केले असून, यापैकी निम्याहून अधिक सेवेकरी मंदिरात उपस्थित राहून सेवा न देता त्यांना दिलेल्या ओळखपत्राच्या आधारे स्वत: आणि आप्तेष्टानाच थेट मंदिरात नेऊन दर्शन घडवून आणत असल्याचे निदर्शनास आले. परंतू सदर बाब मा. मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली हे खरे नाही.

परिक्षणाअंती नियमानुसार उपस्थित राहून सेवा न देणा-या सेवेक-यांच्या नियुक्त्या तात्काळ रद्द करण्याबाबत तसेच भविष्यात केवळ स्वेच्छेने नियमित उपस्थित राहून सेवा देवू इच्छिणा-या भक्तांना सेवेकरी म्हणून नियुक्ती देण्याबाबत न्यासास कळविण्यात आले. तसेच ठराविक मर्यादेतच सेवेकरी नियुक्त करण्याबाबतचे निर्देशही न्यासास देण्यात आले आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

न्यासाच्या अध्यक्षांनी माजी कार्यकारी अधिकारी यांच्या विरोधात तक्रार केलेली आहे. तक्रारीच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) होय,

याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) होय, याबाबतची तक्रार प्राप्त झाली हे खरे आहे. तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे विभागाच्या सहसचिव दर्जाच्या अधिका-यास निर्देश देण्यात आले आहेत. या नुसार कार्यवाही सुरु आहे.

(६) उपरोक्त प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील मूकबधीर मुलींच्या निवासी शाळेतील मुलींचे झालेले लैंगिक शोषण

**(६८) * १३४९८४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत**

**गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील मूकबधीर मुलींच्या निवासी शाळेतील ज्ञानोबा म्हस्के, अर्जुन सातपुते, संतोष कुलाल व सिध्देश्वर वाघमोडे या चार शिक्षकांनी त्याच शाळेतील चार मूकबधीर मुलींचे लैंगिक शोषण केल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पंढरपूर उपविभागीय पोलीसांच्या दामिनी पथकाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर शिक्षकांवर तसेच इतर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. यातील आरोपी शिक्षक ज्ञानोबा म्हस्के, अर्जून सातपूते, संतोष कुलाल व सिध्देश्वर वाघमोडे यांनी पिडीत मुलींना मनास लज्जा वाटेल असे गैरकृत्य व गैरवर्तन करून पिडीत मुलींचा विनयभंग करून त्यांच्यावर लैगिंक अत्याचार केला आहे.

(२) यासंदर्भात पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६५५/१९ भा.द.वि. सं. क. ३५४ (अ) (१), ३५४ (ब), ३५४ (क), सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १०, ११(२)१२, ७, ८, व ९ (एफ) (के) प्रमाणे दि.३०/०३/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.